रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८७ । अंक ३५९ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



हॉटेल जॉब-सुपरवायझर
१० वी पास/नापास ( वय वर्ष १८ पूर्ण)
१२,000/- पगार
राहणे/जेवण/फ्री
संपर्क- पाटील ब्रदर्स हॉटेल
पांडवादेवी, पो. पोयनाड
मो.नं. ८६९८७६000२/८६९८७६000८
८६९८७६000५

# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. ५ जून २०२४

किंमत ४ ₹




## 400 पारचा नारा फेल
## 240 मध्येच अडकला खेळ

# आघाडीची मुसंडी, भाजपची घसरगुंडी




। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

देशात अनेक राजकीय उलथापालथी आणि घडामोडींनंतर अखेर १८ वी लोकसभा निवडणूक पार पडली. सात टप्प्यात घेण्यात आलेल्या या निवडणुकीचे निकाल मंगळवारी (दि. ५) जाहीर झाले. भाजपाची हुकूमशाही मोडीत काढण्यासाठी काँग्रेससह देशभरातील विविध पक्षांनी एकत्रित येत स्थापन केलेल्या इंडिया आघाडीने लोकसभा निवडणुकीत जोरदार मुसंडी मारली असून, भाजपप्रणित एनडीएला घाम फोडला आहे. भाजपची गाडी २४० जागांवर येऊन अडकली आहे, तर एनडीएला २९१ जागांसह बहुमत मिळालं आहे. दुसरीकडे इंडिया आघाडीला २३४ जागांवर आघाडी मिळाली आहे, यात एकट्या काँग्रेसची ९९ जागांवर आघाडी आहे.

देशात पुन्हा एकहाती सत्तेची स्वप्न पाहणाऱ्या, ४०० पारचा नारा देणाऱ्या भाजपाला अनेक ठिकाणी अस्तित्वासाठी झगडावे लागले. बहुमताचा आकडा गाठतानाही त्यांना तारेवरची कसरत करावी लागणार आहे. सत्तेचा गैरवापर करुन, विविध यंत्रणांचा धाक दाखवून अनेक राज्यात सत्ता बळाकावण्याचे काम भाजपाने केले हे काही जपून राहिले नाही. भाजपाचे फोडाफोडीचे राजकारण जनतेला पसंत पडलेले नाही. त्यामुळेच त्यांनी आपली नाराजी मतदानातून दाखवली आहे. इंडिया आघाडीने जोरदार मुसंडी मारली असून, भाजपाची मात्र घसरगुंडी झाल्याचे चित्र आहे.

•› पान २ वर

### कर्नाटकमध्येही भाजपला फटका

एकूण २८ जागांपैकी १६ जागांवर भाजपचे उमेदवार आघाडीवर आहेत. तर १० जागांवर काँग्रेसचे उमेदवार आघाडीवर आहेत. धर्मनिरपेक्ष जनता दलाचे दोन उमेदवार आघाडीवर आहेत. म्हणजेच ज्या पद्धतीने महाराष्ट्र, उत्तर प्रदेश या राज्यात फटका बसला होता, तसाच फटका भाजपला कर्नाटकमध्येही बसला आहे. येथे कर्नाटकच्या जागा कमी झाल्या आहेत.

### ममतांचीच जादू!



पश्चिम बंगालमधील लोकसभेच्या ४२ जागांसाठी मोठेच राजकीय घमासान झाले. ममतांचा गड काबीज करण्यासाठी भाजपने येथे मोठीच ताकद लावली होती. पण, तरीही या राज्यावरील आपली पकड मजबूत ठेवण्यात ममतादीदी यशस्वी ठरल्या असून, त्यांनी ४२ पैकी ३० जागांवर यश मिळवले आहे.

> इंडिया आघाडीने एकत्र येत देशात आणि राज्यात चांगले काम केले आहे. कोठेही उमेदवारीवरुन मतभेद झाले नाहीत. त्यामुळे देशातील लोकशाही आणि संविधान जपण्याचे काम या निवडणुकीने केले आहे. हे इंडिया आघाडीचे फार मोठे यश आहे. राज्यात महाविकास आघाडीला यश मिळणारच होते. रात्री उशिरापर्यंत काही ठिकाणी मतमोजणी सुरु होती. मतमोजणीमध्ये हेराफेरी होते. त्यामुळे त्याचा विपरीत परिणाम होतो. अजून आमच्या सात–आठ जागा आल्या असत्या. सत्ताधारी हे प्रशासनाला हातीशी धरुन दबाव आणण्याचे काम करत असल्याचे दिसते. महाविकास आघाडीची एकी आगामी विधानसभेच्या निवडणुकीत वेगळे चित्र निर्माण करेल.
>
> – आमदार जयंत पाटील, शेकाप सरचिटणीस

> देशाच्या नागरिकांनी एनडीएवर सतत तिसऱ्यांदा विश्वास दाखवला. भारताच्या इतिहासातला हा ऐतिहासिक विजयाचा क्षण आहे. मी या स्नेह आणि आशीर्वादासाठी आपल्या कुटुंबासमोर नतमस्तर होतो. मी देशातील नागरिकांना शब्द देतो की, त्यांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी आम्ही नेहमी नवी ऊर्जा, नवीन संकल्पाना घेऊन पुढे येऊ.
>
> – नरेंद्र मोदी

> महाराष्ट्रातील जनतेचे आभार. राष्ट्रवादीच्या सर्व कार्यकर्त्यांनी अतिशय कष्ट घेतले. त्याबद्दल मी त्यांची कृतज्ञता व्यक्त करतो. हा लोकसभेचा निकाल देशातील परिवर्तनाला पोषक असा आहे. सध्याचं चित्र देशातदेखील आशादायक आहे. उत्तर प्रदेशातदेखील चांगला निकाल लागला आहे. दिल्लीत होणाऱ्या बैठकीत पुढची रणनीती ठरवून इंडिया आघाडीच्या बैठकीत सामूहिकपणे घेऊ निर्णय घेऊ.
>
> – शरद पवार

> आम्ही एका पक्षाविरोधात लढलो नाही. आम्ही प्रशासकीय व्यवस्थेविरोधात लढलो. देशातील विविध संस्थांविरोधात लढलो. आम्ही ईडी, सीबीआय, प्राप्तीकर विभाग यांच्याविरोधात लढलो. कारण, या संस्था नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांनी ताब्यात घेतल्या आहेत. इंडिया आघाडीला जनतेने स्वीकारले असून, भरभरुन मतदान केले आहे. त्याबद्दल देशवासियांचे आभार व्यक्त करतो.
>
> – राहुल गांधी

> आपल्या देशामध्ये सर्वसामान्य माणसाने सर्वसामान्य माणसाची ताकद काय असते ते दाखवून दिलं आहे. त्याबद्दल मी संपूर्ण सर्वसामान्य नागरिकांचं अभिनंदन करतो. सत्ताधारी कितीही मस्तवाल झाले तरी एका बोटाने आपण त्यांना हरवू शकतो, त्यांना रोखू शकतो हे आज देशाच्या जनतेने जगाला दाखवलं आहे. त्याबद्दल मला अभिमान आणि आनंद आहे.
>
> – उद्धव ठाकरे

### महत्त्वांच्या राज्यांचा निकाल

**गुजरात २६**
भाजपा २५
काँग्रेस ०१

**पंजाब १३**
भाजप ००
काँग्रेस ०७
आप ०३
इतर ०३

**दिल्ली ०७**
भाजपा ०७

**हरियाणा १०**
भाजपा ०५
काँग्रेस ०५

**मध्यप्रदेश २९**
भाजपा २९

**गोवा ०२**
भाजपा ०१
काँग्रेस ०१

**तेलंगणा १७**
भाजपा ०८
काँग्रेस ०८
इतर ०१

**उ. प्रदेश ८०**
भाजपा ३२
सपा ३८
काँग्रेस ०६
इतर ०४

## रायगडात अखेर धनशक्तीचा विजय

### जनतेसाठी तत्पर राहणार; अनंत गीते यांचे प्रतिपादन

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीत अखेर धनशक्तीचा विजय झाला आहे. इंडिया आघाडीतील शिवसेना (ठाकरे गट) उमेदवार अनंत गीते यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे. महायुतीमधील राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) सुनील तटकरे यांना पाच लाख आठ हजार ३५२ मते मिळाली, तर चार लाख २५ हजार ५६८ मतदारांनी अनंत गीते यांच्यावर विश्वास दाखवला आहे.

भाजपाने ही लढत अतिशय प्रतिष्ठेची केली होती. त्यामुळे भाजपानेदेखील या मतदारसंघात लक्ष घातले. त्यामुळे मतदानाच्या दोन दिवस आधी सहाही विधानसभा मतदारसंघातील मतदारांना लक्ष्मीचे दर्शन घडवल्याची जोरदार चर्चा तेव्हा रंगली होती. त्यामुळे त्याच ठिकाणी बाजी पलटली. स्वच्छ चारित्र्याचे व्यक्ती अशी अनंत गीते यांची पहिल्यापासून ओळख आहे. मतदारांना प्रलोभने, आमिष दाखवणे हे त्यांच्या तत्त्वात बसत नाही. त्यामुळे अखेर धनशक्तीचा विजय झाला. दरम्यान, इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांनी सर्व मतदारांचे, इंडिया आघाडीतील घटक पक्षातील नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, जिल्हा प्रशासन, जिल्हा पोलीस प्रशासन आणि पत्रकारांचे आभार मानले आहेत. जनतेच्या सेवेसाठी मी सदैव तत्पर राहणार असल्याचे गीते यांनी स्पष्ट केले आहे.

## दादांना चपराक

### आधी लेक, आता पत्नी पराभूत

**। पुणे । प्रतिनिधी ।**

तू निवडून कसा येतो तेच बघतो, तू आमदार कसा होतो तेच बघतो, अशा धमक्या, इशारे देणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवारांना बारामतीत, त्यांच्याच होम ग्राऊंडवर धक्का बसला आहे. काकांसोबत फारकत घेऊन पक्षावर दावा करणाऱ्या, पक्षासह चिन्ह मिळवणाऱ्या अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार बारामतीमध्ये पराभूत झाल्या आहेत. नणंदबाई सुप्रिया सुळेंनी त्यांचा लाखापेक्षा अधिक मतांनी पराभव केला.

बारामतीत यंदा प्रथमच पवार विरुद्ध पवार असा संघर्ष झाला. काकांची साथ सोडून महायुतीमध्ये गेलेल्या, उपमुख्यमंत्रिपद मिळवणाऱ्या अजित पवारांनी पत्नी सुनेत्रा पवार यांना बारामतीमधून उमेदवारी दिली. त्यांच्यासमोर शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुप्रिया सुळेंचं आव्हान होतं. नणंद विरुद्ध भावजय या संघर्षाला काका विरुद्ध पुतण्या संघर्षाचीदेखील किनार होती. अजितदादांनी मतदारसंघात जातीनं लक्ष घातलं. आपली सगळी यंत्रणा त्यांनी कामाला लावली.

काका विरुद्ध पुतण्या लढाईत काकांनी बाजी मारली. सुप्रिया सुळेंनी सलग चौथ्यांदा बारामतीमधून निवडणूक जिंकली. आतापर्यंतच्या निवडणुकांमध्ये कायम सोबत असलेले अजित पवार यंदा थेट विरोधात असल्यानं सुळेंसाठी आव्हान होतं. पण शरद पवारांनी •› पान २ वर

## राज्यात महाविकास आघाडीचे पारडे जड

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीत राज्यात महाविकास आघाडीने महायुतीला जोरदार झटका दिला आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे पक्ष फुटल्यानंतरही महायुतीची २० चा आकडा पार करतानाही पुरती दमछाक उडाल्याचे पाहायला मिळाले. भाजपाच्या फोडाफोडीच्या राजकारणामुळे राज्यातील जनतेने मतदानातून महायुतीला अस्मान दाखवले. राज्यात भाजपला फक्त १० जागांवर आघाडी मिळाली आहे. तर महायुतीला राज्यात फक्त १७ जागा मिळाल्या आहेत. तर महाविकास आघाडीने जोरदार मुसंडी मारली आहे. महाविकासआघाडीला राज्यात ३० जागांवर आघाडी मिळाली आहे. सांगलीमध्ये काँग्रेसचे अपक्ष उमेदवार विशाल पाटील विजयी झाले आहेत.

बारामतीमध्ये सुनेत्रा पवार यांना निवडून आणण्यासाठी अजित पवारांनी जंग-जंग पछाडलं. जे जे नेते सुप्रिया सुळेंच्या प्रचारात होते, त्यांना कोणत्याही मार्गाने आपल्याकडे वळवलं. त्यामध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना मदत करताना कोणतीही कसर सोडली नाही. आतापर्यंत बारामतीमध्ये जी काही विकासकामं केली आहेत ती आपणच केली असल्याचा दावा अजित पवारांनी केला. बारामतीमधील निवडणूक ही अतितटीची होणार असल्याचं चित्र असतानाही निकालानंतर •› पान २ वर

### बिहार ४०
जेडीयू १२
आरजेडी ०४
भाजपा १२
काँग्रेस ०३
इतर ०९

**प. बंगाल ४२**
टीएमसी २९
भाजपा १२
काँग्रेस ०१

**कर्नाटक २८**
भाजपा १७
काँग्रेस ०९
जेडीएस ०२

**छत्तीसगड ११**
भाजपा १०
काँग्रेस ०१

**आसाम १४**
भाजपा ०९
काँग्रेस ०३
एजीपी ०१
यूपीपीएल ०१

**चंदीगड ०१**
काँग्रेस ०१

**दमण-दीव ०१**
इंडिया ०१

**हि. प्रदेश ०४**
भाजपा ०४

**ज. काश्मीर ०५**
भाजपा ०२
जेकेएनसी ०२
इंडिया ०१

### अजित पवारांवर विश्वास नाही

महाराष्ट्राच्या राजकारणात काका पुतण्यातील लढत कुणापासून लपून राहिलेली नाही. पुतणे अजित पवार यांनी शरद पवारांविरुद्ध एकदा नव्हे तर दोनदा बंड केले. सकाळच्या शपथविधीच्यावेळी झालेली चूक काकांनी सुधारून पुतण्याला माफ केले. पण, दुसऱ्यावेळी पुन्हा तीच चूक अजितदादा यांनी केली. त्यामुळे शरद पवार यांच्यासोबत फारकत घेऊन काकांचा विश्वासघात करणाऱ्या अजित पवारांना या निवडणुकीच्या माध्यमातून करून महाराष्ट्रातील जनतेने धडा शिकवला आहे. अजित दादा यांच्यापेक्षा शरद पवार यांच्यावरच आपला विश्वास असल्याचे महाराष्ट्राच्या या निकालात स्पष्ट केले आहे.

## स्मृती इराणी, राणांचा पराभव

भाजपच्या नेत्या व केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांचा अमेठी मतदारसंघातून दारूण पराभव झाला आहे. काँग्रेसचे उमेदवार किशोरी लाल शर्मा यांनी इराणी यांचा १,१८ ४७१ मताधिक्यांनी पराभव केला आहे. त्यामुळे सध्या भाजपची बहुरानीचा पराभव झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे

**अमेठीत काँग्रेसनं उधळला विजयाचा गुलाल**



स्मृती इराणी या २०१४ साली पहिल्यांदा अमेठी मतदारसंघातून निवडणूक लढल्या होत्या. मात्र त्यावेळी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी त्यांचा पराभव केला होता. मात्र त्यानंतरही त्यांना केंद्रात मंत्रीपद देण्यात आले होते. २०१९ ला स्मृती इराणी यांनी अमेठीमधून राहुल गांधी यांचा पराभव केला होता. यंदा राहुल गांधी यांनी रायबरेली मतदारसंघातून निवडणूक लढवल्याने यंदा अमेठीतून किशोरी लाल शर्मा यांना संधी देण्यात आली होती.

भाजपच्या उमेदवार नवनीत कौर राणा यांचा पराभव झाला आहे. अमरावतीमध्ये भाजपच्या उमेदवार नवनीत राणा यांची काँग्रेस-महाविकास आघाडीचे नेते बळवंत वानखडे यांच्याशी लढत होती. या निवडणुकीच्या रणात बळवंत वानखडे यांनी नवनीत राणा यांचा पराभव केला. मात्र, या दोघांमधील स्पर्धा खूपच चुरशीची होती. दोघांची प्रतिष्ठा पणाला लावली होती. मतमोजणी सुरू झाल्यापासून कधी नवनीत राणा, तर कधी बळवंत वानखेडे आघाडीवर होते. पण, जनतेने शेवटी बळवंत वानखेडे यांचीच निवड केली.

पाचवेळा खासदार असलेले आणि केंद्रात रेल्वे राज्यमंत्री म्हणून काम केलेल्या रावसाहेब दानवेंना सगळ्यात मोठा पराभव स्वीकारावा लागला. दानवे सुमारे ६० हजार मतांच्या फरकाने पराभूत झाले आहेत. दिंडोरी मतदारसंघात डॉ. भारती पवार यांना शरद पवार गटाच्या भास्कर भगरे यांनी सुमारे १ लाख मतांनी पराभूत केले. राज्यमंत्री म्हणून कपिल पाटील यांचा शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्यामामा यांनी ८० हजार मतांनी पराभव केला आहे. राज्यात वनमंत्री असलेल्या सुधीर मुनगंटीवार यांचा काँग्रेसच्या प्रतिभा धानोरकर यांनी २ लाख ५० हजारांपेक्षा जास्त मतांनी पराभव केला आहे.

### जनतेने नाकारले

निवडणूक आयोगाने शरद पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष असो वा उद्धव ठाकरे यांची शिवसेना हे पक्ष फोडणारे अनुक्रमे अजितदादा आणि एकनाथ शिंदे यांना जनतेने नाकारले आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतरची ही महाराष्ट्रातील पहिलीच मोठी निवडणूक झाली. मात्र, जनेतेने एकनाथ शिंदे आणि अजित पवार गटाला या निवडणुकीच्या माध्यमातून सडेतोड उत्तर दिले आहे.

### राहुल गांधींचा डबल धमाका

काँग्रेसचे माजी अध्यक्ष तथा खासदार राहुल यांनीही यावेळी नेत्रदीपक कामगिरी केली असून, वायनाड आणि रायबरेली या दोन्ही जागांवर तीन लाखांपेक्षा अधिक मतांच्या फरकांनी विजय मिळवला. रायबरेलीच्या निकालामुळे काँग्रेसला नवसंजीवनी मिळाली असून, काँग्रेसच्या गोटात जल्लोषाचे वातावरण आहे.

# बांधकाम व्यावसायिकाविरोधात एल्गार

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत तालुक्यातील पळसदरी ग्रामपंचायत हद्दीतील वर्णे, तिघर, नांगुर्ले येथील शेतकर्‍यांच्या जमिनीवर कल्पतरू गृहनिर्माण प्रकल्पाकडून सीमा बंद केल्या जात आहेत.तेथील व्यायामशाळा इमारत संबंधित बांधकाम व्यावसायिकांनी तोडली असून, वर्णाई देवीच्या मंदिराकडे जाणारा रस्तादेखील उद्ध्वस्त केला आहे. त्यामुळे स्थानिक शेतकर्‍यांनी पत्रकार परिषद घेऊन आपल्यावर होत असलेल्या अन्यायाविरुद्ध आरपारची लढाई लढण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.**



तेथील हनुमान मंदिर येथे झालेल्या पत्रकार परिषदेत पांडुरंग शिर्के आणि ॲड. राजेंद्र निगुडकर यांनी शेतकर्‍यांची बाजू मांडली. पळसदरी ग्रामपंचायत मधील वर्णे, तिघर आणि नांगुले येथील साधारणपणे १४ शेतकरी कल्पतरू गृहनिर्माण प्रकल्पाच्या सीमेलगत आहेत. वर्णे, तिघर, नांगुर्ले येथील आम्ही शेतकरी आमच्या वडिलोपार्जित जमीन कसत आहोत. येथील शेतकर्‍यांच्या चतु:सीमेवरील १४ शेतकरी असून, कोणत्याच शेतकर्‍याला कोणतीही नोटीस न बजावता जमिनीची मोजणी केली जात आहे. गेली दीड वर्षे त्यांचा प्रकल्प सुरू असून, आता सीमेलगत बांधकाम करायला सुरुवात केली. तर दोनच दिवसांपूर्वी २५ ते ३० जणांचा टोलका शेताच्या बांधावर आला होता. कल्पतरू कंपनीला राजकीय आणि प्रशासकीय अभय असल्याने शेतकर्‍यांच्या जमिनीवर अतिक्रम करू पाहात असल्याचा दावा शेतकरी पांडुरंग शिर्के यांनी केला आहे.

तेथे काही फोन आम्हाला येत असून, त्यामध्ये स्थानिक आमदार यांचे बंधू मनोहर थोरवे यांनीसुद्धा फोन करून आम्हाला दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र, आम्ही त्यांना सांगितले की, आमचा आणि कंपनीचा जो काही मॅटर आहे आम्ही तो पाहून घेऊ, तुम्ही त्यात लक्ष घालू नये, अशी मी त्यांना विनंती केली. तसेच रितसर सरकारी सर्वे केल्याशिवाय तुम्ही कोणत्याही प्रकारचे बांधकाम सुरू करू नका, असेही सांगितले. भविष्यात शेतकर्‍यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना दादागिरी करणार्‍या लोकांपासून धोका आहे, असे पत्रकार परिषदेत पांडुरंग शिर्के यांनी सांगितले.

यावेळी बोलताना ॲड. राजेंद्र निगुडकर शेतकर्‍यांचे प्रतिनिधी म्हणून बोलताना या अन्यायाच्या मागे आमदार थोरवे असल्याचे घणाघाती आरोप केलेले आहेत. तहसीलदार यांची जबाबदारी आहे की शेतकर्‍यांना अडचणी असतील तर त्या सोडवाव्यात, मात्र प्रशासन राजकीय दबावाखाली जर काम करत असेल, राजकीय हेतूने काम करत असेल, तर त्यांनी विचार बदलून शेतकर्‍यांना न्याय मिळवून द्यावा. कोणती अदृश्य शक्ती कंपनीच्या मागे आहे. जमीन मोजणी करून हद्द निश्चित करून काम करावे, मध्यभागी असलेल्या शेतकर्‍यांना रस्ता द्यावा. दिनेश नरे या शेतकर्‍यांना वीटभट्टी, शेतीकडे जाण्यासाठी त्यांना रस्ता लागणार आहे त्यांना रस्ता द्यावा वरणाई

## ■ ग्रामस्थ, शेतकरी आक्रमक
## ■ जमिनीच्या सीमा बंद करण्याचा प्रयत्न

मंदिराकडे जाण्यासाठी रस्ता द्यावा ही सुद्धा मागणी आम्ही लावून धरलेली आहे. अशा मागणीचे पत्र आम्ही तहसीलदार यांना ९ फेब्रुवारी रोजी दिलेला आहे. वास्तविक तहसीलदार यांनी स्थळ पाहणी करून निर्णय घेणे आवश्यक होते. आज पाऊस पडल्यास, पेरणी सुरू होऊ शकते. मात्र, तहसीलदार शेतकर्‍यांना न्याय न देता, कोणतीच कार्यवाही करीत नाहीत. त्यामुळे तहसीलदार नक्की कोणाचे आहेत, असा सवालदेखील त्यांनी केला. तर, शासकीय निधीमधून बांधण्यात आलेली व्यायामशाळा इमारत कल्पतरू कंपनीने जमीनदोस्त केलेली आहे. तरीदेखील प्रशासन मात्र ढीम्म आहे, असा संतप्त सवाल शेतकर्‍यांनी केला.

# विद्यार्थ्यांनी तयार केले सीड बॉल



**। हमरापूर । वार्ताहर ।**

वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन ही काळाची गरज असून, या पर्यावरणविषयक चळवळीमध्ये शालेय विद्यार्थ्यांचाही सक्रिय सहभाग असावा यासाठी पेण तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या मायणी शाळेतील विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने सीड बॉल तयार केले आहेत.

मे महिन्यातील सुट्टीचा आनंद घेत विद्यार्थ्यांनी विविध फळांच्या बिया गोळा करून समप्रमाणात माती व शेणखत यांच्या मिश्रणाने हे गोळे तयार करून त्यामध्ये प्रत्येकी एक किंवा दोन या प्रमाणात फळांच्या बिया ठेवल्या आहेत. उन्हामध्ये हे गोळे वाळवले असून, पावसाळा सुरू झाला की हे सीडबॉल गावाच्या अवतीभवती असलेल्या पडीक जमिनीवर ठेवले जाणार आहेत. विद्यार्थ्यांनी हे सीडबॉल तयार करण्यासाठी मायणी शाळेतील शिक्षक रामकृष्ण भोईर यांनी मार्गदर्शन केले.

दरम्यान, मे महिन्याच्या सुट्टीमध्ये मुलं मोबाईलमध्ये व्यस्त असताना मायणी शाळेतील विद्यार्थ्यांनी पर्यावरण रक्षणासाठी हाती घेतलेल्या उपक्रमाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# आज शहराचा पाणीपुरवठा बंद

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

जलवाहिनीची दुरुस्ती केली जाणार आहे. त्यामुळे बुधवारी (दि. ५) सायंकाळी संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा बंद राहणार असल्याची माहिती अलिबाग नगरपरिषदेकडून देण्यात आली आहे.

बांधण येथे दुरुस्तीचे काम केले जाणार आहे. एमआयडीसी कार्यालयाकडून शटडाऊन घेतला जाणार आहे. त्यामुळे हा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. मात्र, त्यानंतर पुढील तीन दिवस शहराला कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांनी पाणी जपून वापरा, पाण्याचा अपव्य करू नये, असे आवाहन नगरपरिषदेकडून करण्यात आले आहे.

# मिनी ट्रेनमुळे आदिवासींना हक्काचा रोजगार

## ■ विद्यार्थ्यांच्या शाळेच्या खर्चासाठी मदत

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ माथेरान नेरळ मार्गावर चालविल्या जाणार्‍या मिनीट्रेनमुळे नेरळ ते माथेरानदरम्यान असलेल्या मार्गावरील स्थानकात आदिवासी लोकांकडून जंगली मेवा विकला जातो. त्यातून या उन्हाळी पर्यटन हंगामात आदिवासी लोकांना चांगला रोजगार मिळाला असून, त्या ठिकाणी आपल्या आईसोबत जंगली मेवा विकायला मदत करणार्‍या आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदतदेखील उभी राहिली आहे.

मध्य रेल्वेच्या नेरळ -माथेरान -नेरळ या पर्वतीय मिनीट्रेनच्या या मार्गावरील प्रवास हा स्थानिक आदिवासींच्या रोजगाराच्या दृष्टीने महत्वाचा असतो. परीक्षा संपल्या की आदिवासी वाड्यांमधील



विद्यार्थी आपल्या आईवडिलांसोबत मिनी ट्रेनच्या स्थानकात बसून मिनी ट्रेनमधून प्रवाशांना जंगली मेवा विकत असतात. हे नेरळ माथेरान नेरळ मार्गावर मिनी ट्रेन जेव्हापासून चालविली जात आहे, तेव्हापासून हे सुरूच आहे. शाळांना सुट्टी असल्याने विद्यार्थी हे आपला शैक्षणिक खर्च सोडविता यावा म्हणून किमान दोन महिने स्टेशनवर बसूनच असायचे. हे अनेक वर्षे सुरू असून मधल्या काळात नेरळ माथेरान मिनी ट्रेन मार्गाचे नुकसान पावसाळ्यात झाल्याने ती बंद होती आणि त्यावेळी आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अन्य ठिकाणी रोजगार मिळवावा लागला होता.

मात्र ऑक्टोबर २०२२ पासून मिनी ट्रेन नेरळ माथेरान नेरळ मार्गावर चालविली जात आहे. तेव्हापासून स्थानिक आदिवासी लोक मिनी ट्रेनच्या स्थानकात बसून जंगली मेवा विकून रोजगार शोधत आहेत. त्यात परशुराम बांगारे, भगवान दिपक डूमणे,दारकाबाई तुकाराम डूमणे,शेवंती मंगळ पारधी,शेवंता पांडुरंग डूमणे,अनुसया गोविंद सराई, ताई परशुराम बांगरे, द्रौपदी सखाराम बांगरे यांच्यासारखे अनेक कुटुंबांना मिनी ट्रेनने रोजगार दिला आहे. मिनी ट्रेन सुरु असल्याने आमच्या समाजातील मुलांना शाळेत जाताना नवीन कपडे घेण्यासाठी थोडे पैसे जंगलात मेवा विकून मिळाल्याची प्रतिक्रिया बेकरे वाडी येथील गणेश पारधी यांनी दिली.

# सर्व्हिस रोड होतोय ‘पार्किंग झोन’

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ च्या चौपदरीकरणादरम्यान पोलादपूर तालुक्यातील पार्ले ते दिविल उड्डाणपुलाच्या दुतर्फा असलेल्या सर्व्हिस रोडवर ट्रक, कंटेनर, टँकर्सचे ’पार्किंग झोन’ तयार झाले आहे. येथे असलेल्या राजस्थानी ढाब्याचे स्वत:चे पार्किंग झोन असूनही सर्व्हिसरोडचा सर्रास वापर वाहनचालकांकडून केला जात असल्याने पार्ले ग्रामस्थांच्या मोटारसायकली व ऑटोरिक्षांना या महाकाय वाहनांची धडक बसून अपघात होण्याची धास्ती वाटत आहे.



## ग्रामस्थांना अपघातांची धास्ती

महामार्गावरील काही गावांना सर्व्हिसरोडद्वारे अलिप्त ठेवण्यात आले आहे. या सर्व्हिसरोडला कॅटलपास आणि अंडरपास भुयारी मार्ग करण्यात आले असून, याद्वारे पार्ले गावठाण, पार्ले बौध्दवाडी आणि पार्ले आदिवासीवाडीतील ग्रामस्थांना पश्चिमेकडील लोकवस्ती आणि पूर्वेकडील नदीपात्र तसेच शेतजमिनी आणि गुरांचे वाडे आणि शेतघरांकडे ये-जा करणे शक्य होत असते. या सर्व्हिसरोडच्या मधोमध असलेल्या ओव्हरब्रिजवरून राष्ट्रीय महामार्गाची वाहतूक सुरू असून, दिविल केटी बंधार्‍याच्या आधी काही अंतरावर हा ओव्हरब्रिज संपताच राजस्थानी हॉटेलमध्ये येणार्‍या प्युअर व्हेज वाहतूकदार ड्रायव्हर व क्लिनरच्या ग्राहकांच्या ट्रक, कंटेनर, टँकर्स आदी वाहनांचे पार्किंग पूर्वेकडील नदीपात्रालगत मातीचा भराव करून तयार केलेल्या क्षेत्रात करण्याची सुविधा या हॉटेलवजा ढाब्याच्या मालकाने उपलब्ध केली आहे. मात्र, महामार्गावरील वाहतूकदारांमध्ये राजस्थान तसेच गुजरात राज्यातील शाकाहारी वाहतूकदारांची संख्या अधिक असल्याने याठिकाणी वाहनांची गर्दी संपूर्ण पार्किंग झोन व्यापून सर्व्हिसरोडपर्यंत होत असल्याचे दिसून येत आहे. दिवसा जेवणानंतर वाहने विश्रांतीसाठी उभी केलेली दिसतात, त्याचप्रकारे रात्रीदेखील वाहनांची गर्दी होत असल्याने अनेक दुचाकी वाहनांना ही वाहने मागे-पुढे करताना अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# राज्यात बाईक टॅक्सीला हिरवा कंदील मिळणार?

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

ॲप आधारित कंपनीच्या रायडरसाठी जाहिरात सुरू झाली आहे. त्यामुळे आचारसंहिता हटवल्यानंतर राज्यात बाईक टॅक्सीला हिरवा कंदील मिळणार आहे, अशी चर्चा सुरू झाली आहे.

बाईक टॅक्सी, ओला, उबर, रॅपिडोबाबत धोरण ठरवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कमिटी स्थापन केली आहे. रमानाथ झा (सेवानिवृत्त भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमण्यात आली होती. बाईक टॅक्सीला परवानगी देण्यास रिक्षा संघटनांनी विरोध दर्शविला होता; मात्र या समितीने सकारात्मक अहवाल दिला होता. त्यावर अद्याप निर्णय झाला नाही; परंतु त्यापूर्वीच ॲप आधारित कंपनीच्या रायडरसाठी जाहिरात सुरू केली आहे. राज्यात परिवहनेतर संवर्गातील वाहनांची (दुचाकी, तीनचाकी आणि चारचाकी) मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. त्यामुळे राज्य सरकारने प्रवाशांच्या सुरक्षेसाठी परिवहनेतर संवर्गात नोंदणी केलेल्या वाहनांचे नियमन करण्यासाठी त्यांना एग्रीगेटर म्हणून महाराष्ट्रात सेवा बजावता यावी, यासाठी समिती नेमली होती. या वाहनांमुळे इतर वाहनांच्या उत्पन्नावरही परिणाम होईल. त्यामुळे काही संघटनांनी याला विरोध दर्शवला आहे. बाईक टॅक्सीला पसंतीबाईक टॅक्सीला प्रवाशांची मागणी आहे. एका व्यक्तीला प्रवास करायचा असेल, तर बाईक टॅक्सीचे भाडे कमी आहे. तसेच बाईक टॅक्सी रिक्षा किंवा टॅक्सीच्या तुलनेत कमी जागा व्यापते. आपल्या दारात बाईक चालक येत असल्याने प्रवाशांचा वेळ वाचतो. प्रवाशाला कमी वेळेत आपल्या ठिकाणी पोचता येईल, असे परिवहन विभागाच्या वरिष्ठ अधिकार्‍याने सांगितले.

# सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर अहिल्या रत्न पुरस्काराने सन्मानित

**। उरण । वार्ताहर ।**

मागील तीन दशकांपासून रायगड जिल्ह्यातील आदिवासींच्या मूलभूत हक्कांची लढाई लढणारे, मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पग्रस्तांचे नेते तथा ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रायगड भूषण सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांना रविवार (दि,२) रोजी समाजकार्यासाठी अहिल्या रत्न पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले.

कर्जत तालुक्यातील शेलू येथे राजामाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची २९९ वी जयंती साजरी करण्यात आली यावेळी रायगड भूषण समाजसेवक संतोष ठाकूर यांना अहिल्या रत्न पुरस्कार, पेन



तालूका धनगर समाजाचे अध्यक्ष राजू आखाडे यांना समाज भूषण पुरस्कार,आदर्श शिक्षक लक्ष्मण ढेबे, उत्कृष्ट पत्रकार दत्तात्रय शेडगे, श्रीरंग बंडगर यांना समाज भूषण पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. यावेळी ऑल इंडिया धनगर समाज महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण काकडे, गुरुनाथ शेठ हर हर चांगभले धनगर समाज संस्थेचे रायगड जिल्हाध्यक्ष अँड संतोष आखाडे, परमाणंद नाचण,रामचंद्र पुकळे वैभव यादव बाळासाहेब गुटुगडे, ऑल इंडिया धनगर समाज महासंघाचे कार्यकारिणी सदस्य संतोष घाटे, रायगड जिल्हा प्रभारी आनंदराव कचरे, पेन तालूका धनगर समाज अध्यक्ष राजू आखाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# भारत हा जगातील सर्वात जास्त मांजर पालन करणारा देश

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

हल्ली मांजर पाळणार्‍यांची संख्या भारतात झपाट्याने वाढत आहे किंबहुना मांजर पालन क्षेत्रात भारत हा जगात अव्वल ठरत आहे. उंदरांचा खात्मा करण्यासाठी मांजर पाळणे हा उद्देश मागे पडला असून हल्ली मांजर पालन हा प्रेस्टीजचा विषय झाला आहे. कोविड काळात जनजीवन ठप्प झालेले असताना पाळीव प्राण्यांसोबत आपल्या भावना व्यक्त करणार्‍यांच्या प्रमणात लक्षणीय वाढ झाली, त्यात मंजर हा आर्थिक दृष्ट्या परवडणारा प्राणी असल्याने अनेकानी तो पर्याय निवडला होता असे प्रतिपादन फीलाईन क्लब ऑफ इंडियाचे अध्यक्ष साकीब पठाण यांनी केले. मांजर हा प्राणी मुलत: आफ्रिकेतला आहे, त्याची उत्पत्ती ही वाळवंटातली असल्याने तो कमी पाण्यावर जगणारा मात्र पुर्णत: मांसाहारी असतो त्यामूळे त्याचेवर शाकाहार लादणे अन्यायकारक असल्याचे मत श्री कृपा एक्वेरियम खोपोली आणि हेल्प फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या सेमिनारमध्ये रोटरी क्लब ऑफ खोपोलीच्या सभागृहात मोठया संख्येने उपस्थितांना मार्गदर्शन करतांना पठाण यांनी व्यक्त केले. मांजर हा प्राणी जेवढा पाळीव म्हणून प्राणी मित्रांना आवडू लागला आहे तेवढाच तो व्यवसायाच्या दृष्टिकोनातून नवा आणि पूरक पर्याय म्हणून पूढे येत असल्याचे सांगताना मांजरांच्या अंगभूत असलेल्या सवयींच्या अनुषंगाने जर पालन पोषण झाले तर वेगळा आनंद आणि समाधान प्राप्त होईल असा सल्ला यावेळी त्यांनी मांजर प्रेमींना दिला.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिथे मालक यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिथे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे कुशिवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालक | सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| रंभाजी शिवराम पालकर | ४५/२/ड | ०-३२-९० | ४-६२ |
| भाऊ शिवराम पालकर | ३९/१ | ०-०९-१० | १-०६ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विधारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०५/०६/२०२४
ॲड. निलेश कान्हु मोरे मोबा. ९८२२६९११०९
ॲड. वृषाली रघुनाथ मोरे मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर. अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१


## पान १ वरून

### दादांना चपराक

लेकीसाठी आपला संपूर्ण राजकीय अनुभव पणाला लावला. राजकारणातील पैलवान असलेल्या शरद पवारांनी पुतण्याला अस्मान दाखवलं.

बारामतीत पत्नीचा झालेला पराभव अजित पवारांसाठी जास्त धक्कादायक आहे. राजकीय विरोधकांना थेट इशारे देणारे, तू निवडून कसा येतो तेच बघतो म्हणणारे अजित पवार त्यांच्या कुटुंबातील दोन सदस्यांना निवडून आणू शकलेले नाहीत. गेल्या निवडणुकीत अजित पवारांनी त्यांचा मुलगा पार्थला मावळमधून तिकीट दिलं. शिवसेनेच्या श्रीरंग बारणेंनी पार्थ पवारांचा तब्बल २ लाख १५ हजार ९१३ मतांनी पराभव केला. पार्थ यांच्यामुळे पवार कुटुंबाला निवडणुकीच्या राजकारणात पहिल्यांदाच पराभव पाहिला.

### आघाडीची मुसंडी, भाजपची घसरगुंडी

भारतीय जनता पार्टीने यावेळीही लोकसभा निवडणुकीत पीएम नरेंद्र मोदी (छ्रीशपवीर चेवळ) यांच्या नावावर निवडणूक लढवली. पण यावेळी मोदी मॅजिक चाललं नाही. उत्तर प्रदेश, बिहार आणि महाराष्ट्रात भाजपला मोठं नुकसान सहन करावं लागलं. त्यामुळे देशात मोदी मॅजिक कमी झालं का असा प्रश्न निर्माण झाला आहे. याचा फायदा काँग्रेसला झाला आणि कमबॅक करण्यात ते यशस्वी झाले.

गेल्या निवडणुकीत उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये मोठा विजय मिळवणार्‍या भाजपाला यावेळी मोठा धक्का बसला. याचा थेट फायदा काँग्रेसला मिळाला. इतकंच काय तर महाराष्ट्रातही काँग्रेस पक्ष गेम चेंजर बनला. इथे काँग्रेस पक्षाला नव्याने उभारी मिळाली आहे. हरियाणातही भाजपाला नुकसान झालंय. गेल्या निवडणुकीत काँग्रेस बिहार, महाराष्ट्र आणि हरियाणातही शून्य होते.

प्रादेशिक पक्षांची साथ

काँग्रेसच्या कमबॅकचं आणखी एक मोठं कारण म्हणजे प्रादेशिक पक्षांची मिळालेली साथ. उत्तर प्रदेमध्ये समाजवादी पार्टी आणि बिहारमध्ये राष्ट्रीय जनता दलाबरोबरची हातमिळवणी काँग्रेससाठी फायदेशीर ठरली. गेल्या निवडणुकीत काँग्रेस बिहारमध्ये एकही जागा जिंकू शकली नव्हती. तर उत्तर प्रदेशमध्ये केवळ एका जागेवर समाधान मानावं लागलं होतं.

भाजपाचा ४०० चा नारा फेल

लोकसभा निवडणुकीआधी भारतीच जनता पार्टीने ४०० पारचा नारा दिला होता.. पण निकालाच्या दिवशी भाजपला तीनशेचा आकडाही पार करता आला नाही. याउलट, एक्झीट पोलमध्ये इंडिया आघाडी १०० ते १५० जागा जिंकण्याचा अंदाज होता. पण प्रत्यक्षात इंडिया आघाडी सवादोनशे जागा जिंकताना दिसत आहे

### राज्यात महाविकास आघाडीचे पारडे जड

मात्र तसं काही झालं नसल्याचं दिसून आलं. सुप्रिया सुळे यांनी लाखाहून जास्त मताधिक्य घेत विजय संपादन केला.

सोलापूर लोकसभा मतदारसंघाला पहिल्या महिला उमेदवार मिळाल्या आहेत. काँग्रेसच्या प्रणिती शिंदे यांनी जवळपास ७५ हजार मतांनी विजय मिळवलाय. भाजपचे उमेदवार राम सातपुते यांचा दारुण पराभव झालाय. १९५१ पासून एकदाही सोलापुरात महिला खासदार जिंकून आल्या नव्हत्या. हा इतिहास आज मोडलाय.

महाराष्ट्रातील मराठवाड्यात तर अनेक जागांवर अनपेक्षित निकाल आले. ज्या जागांवर भाजपाचे गेल्या अनेक वर्षांपासून वर्चस्व होते, त्या जागांवर मराठवाड्यातील मतदारांनी भाजपला नाकारले. यात बीड आणि छत्रपती संभाजीनगरात महायुतीचा उमेदवार निवडून आला आहे. बाकीच्या जागांवर महाविकास आघाडीच्या उमेदवारांनीच बाजी मारली आहे. छत्रपती संभाजीनगरची निवडणूक चांगलीच चुरशीची झाली. या जागेवर तिहेरी लढत झाली होती. पण या लढाईत महायुतीचे उमेदवार आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते संदिपान भुमरे यांनी बाजी मारली आहे. त्यांनी एमआयएम पक्षाचे नेते इम्तियाज जलील यांना एक लाख मतांच्या फरकाने पराभूत केले आहे. दुसरीकड चंद्रकांत खैरे हे तिसर्‍या स्थानी राहिले आहेत.

जालना या मतदारसंघातून भाजपने केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांना तिकीट दिले होते. मात्र या जागेवर त्यांचा धक्कादायक पराभव झाला आहे. या जागेवरून काँग्रसचे नेते कल्याणराव काळे हे विजयी झाले आहेत. काळे यांनी दानवे यांचा ९० हजारपेक्षा अधिक मतांच्या फरकाने पराभव केला आहे. परभणी या जागेवर राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते रावसाहेब दानवे हे महायुतीकडून उभे होते. त्यांच्या विजयासाठी नरेंद्र मोदी यांनीदेखील परभणीत सभा घेतल्या होत्या. पण त्यांचा येथून धक्कादायक पराभव झाला आहे. या जागेवरून उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे संजय जाधव हे विजयी झाले आहेत. जाधव यांचा १ लाखांपेक्षा अधिक मतांनी विजय झाला आहे. भाजपचे नेते तथा खासदार अशोक चव्हाण यांच्यासाठी नांदेड ही जागा प्रतिष्ठेची होती. भाजपने या जागेवरून प्रतापराव चिखलीकर यांना तिकीट दिले होते. मात्र या जागेवर काँग्रेसचे नेते वसंतराव चव्हाण हे विजयी झाले आहेत. चव्हाण यांचा २५ हजारांच्या मताधिक्याने विजय झाला आहे.

महायुती १८
भाजप १०
शिंदे गट ०७
अजित पवार गट ०१
महाविकास आघाडी २९
ठाकरे गट ०९
शरद पवार गट ०७
काँग्रेस १३


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## SRM E-TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 01. | **Tender No:-** EE/EHV (O&M)/DIVN/MHD/Tech/ E-Tender-14/2024-25 Date:-05.06.2024 **RFx No.7000031320** | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for hiring of MMV (e.g. Bolero Pickup, Tata Shakti Pickup, TATA 407, Mahindra Bolero Camper or similar Type) services along with fuel and driver at Substation Maintenance Sub-Division Mangaon under EHV (O&M) Division Mahad For the year 2024-25. | **Rs.5,98,944/- (including GST)** |
| 02. | **Tender No:-** EE/EHV (O&M) /DIVN/MHD/Tech/ E-Tender-15/2024-25 Date:-05.06.2024 **RFx No.7000031026** | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for hiring of LMV Jeep Type (i.e. Mahindra Xylo, Mahindra Bolero, Mahindra TUV, TATA Sumo Gold or similar type etc) services along with fuel and driver at 220 kV Kandalgaon Substation under EHV (O&M) Division Mahad For the year 2024-25. | **Rs.5,80,684/- (including GST)** |
| 03. | **Tender No:-** EE/EHV (O&M) /DIVN/MHD/Tech/ E-Tender-16/2024-25 Date:-05.06.2024 **RFx No.7000031027** | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for hiring of LMV Jeep Type (i.e. Mahindra Xylo, Mahindra Bolero, Mahindra TUV, TATA Sumo Gold or similar type etc) services along with fuel and driver at 220 kV Vile Bhagad Substation under EHV (O&M) Division Mahad For the year 2024-25. | **Rs.5,80,684/- (including GST)** |

EMD will be the 1% of the estimated cost or whichever is the highest & tender fee will be the 500/- plus GST.

Bid submission is from 05.06.2024 @ 00:00 hrs to 11.06.2024 @23:59Hrs for above tender for further details visit our website:-https://srmetender.mahatransco.in

**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**-Sd/-**
**Executive Engineer, EHV(O&M) Dn. Mahad**

# राज्याच्या ‘हाती’ ‘पॉवर’फुल ‘मशाल’

मुंबई : सर्व एक्झिट पोलची पोलखोल करत राज्यात महाविकास आघाडीने पॉवरफुल कामगिरी केली आहे. त्यांनी ४८ पैकी सर्वाधिक ३० जागा जिंकल्या आहेत. ४५ प्लसच्या जागा जिंकण्याचा नारा देणाऱ्या महायुतीला फक्त १७ जागांवरच समाधान मानावे लागले आहे. महाविकास आघाडीच्या माध्यमातून काँग्रेसने सर्वाधिक १३ जागा जिंकल्या आहेत, तर शिवसेना ठाकरे गटाने ९ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने ८ जागांवर वर्चस्व मिळवत विरोधकांना धुळ चारली आहे. राज्यात फोडाफोडीचे राजकारण करणाऱ्या भाजपाला फक्त ९ जागांवर समाधान मानावे लागले आहे, तर शिंदे गटाला ७ आणि अजित पवार गटाला केवळ एकच जागा जिंकता आली आहे. एकूणच शरद पवार गटाच्या तुतारीने आणि उद्धव ठाकरे गटाच्या मशालीने महाराष्ट्रात भाजप, शिंदे गट आणि अजित पवार गटाच्या विरोधात रान पेटविले होते. नेत्यांनी केलेल्या आवाहनांला मतदारांनीदेखील प्रतिसाद दिला.




| मतदारसंघ | विजयी | पराभूत |
|---|---|---|
| बारामती | सुप्रिया सुळे | सुनेत्रा पवार |
| दक्षिण मध्य मुंबई | अनिल देसाई | राहुल शेवाळे |
| शिर्डी | भाऊसाहेब वाकचौरे | सदाशिव लोखंडे |
| नंदुरबार | गोपाल पाडवी | हिना गावित |
| धुळे | डॉ. शोभा बच्छाव | सुभाष भामरे |
| दक्षिण मुंबई | अरविंद सावंत | यामिनी जाधव |
| अमरावती | बळवंत वानखेडे | नवनीत राणा |
| वर्धा | अमर काळे | रामदास तडस |
| मुंबई ईशान्य | संजय दिना पाटील | मिहीर कोटेचा |
| शिरुर | अमोल कोल्हे | शिवाजी पाटील |
| अहमदनगर | निलेश लंके | सुजय विखे |
| माढा | धैर्यशील मोहिते | रणजितसिंह निंबाळकर |
| भिवंडी | सुरेश म्हात्रे | कपिल पाटील |
| उत्तर पश्चिम मुंबई | रविंद्र वायकर | अमोल कीर्तिकर |
| बुलढाणा | प्रतापराव जाधव | नरेंद्र खेडेकर |
| ठाणे | नरेश म्हस्के | राजन विचारे |
| कल्याण | श्रीकांत शिंदे | वैशाली दरेकर |
| धाराशिव | ओमराजे निंबाळकर | अर्चना पाटील |
| कोल्हापूर | शाहू महाराज छत्रपती | संजय मंडलिक |
| संभाजी नगर | संदीपान भुमरे | इम्तियाज जलील |
| हातकणंगले | धैर्यशील माने | सत्यजीत पाटील |
| मावळ | श्रीरंग बारणे | संजोग वाघेरे |
| उत्तर मुंबई | पियूष गोयल | भूषण पाटील |
| अकोला | अनुप धोत्रे | अभय पाटील |
| लातूर | शिवाजी काळगे | सुधाकर शृंगारे |
| नाशिक | राजाभाऊ वाजे | हेमंत गोडसे |
| नागपूर | नितीन गडकरी | विकास ठाकरे |
| पुणे | मुरलीधर मोहोळ | रविंद्र धंगेकर |
| रावेर | रक्षा खडसे | श्रीराम पाटील |
| बीड | बजरंग सोनवणे | पंकजा मुंडे |
| सातारा | उदयनराजे भोसले | शशिकांत शिंदे |
| सोलापूर | प्रणिती शिंदे | राम सातपुते |
| उत्तर मध्य मुंबई | डॉ. वर्षा गायकवाड | ॲड. उज्ज्वल निकम |
| रामटेक | श्यामकुमार बर्वे | राजू पारवे |
| भंडारा-गोंदिया | डॉ. प्रशांत पडोळे | सुनील मेंढे |
| गडचिरोली-चिमूर | डॉ.नामदेव किरसान | अशोक नेते |
| चंद्रपूर | प्रतिभा धानोरकर | सुधीर मुनगंटीवार |
| यवतमाळ-वाशिम | संजय देशमुख | राजश्री पाटील |
| हिंगोली | नागेश आष्टीकर | बाबुराव कोहळीकर |
| नांदेड | वसंत चव्हाण | प्रताप चिखलीकर |
| परभणी | संजय जाधव | महादेव जानकर |
| जालना | कल्याण काळे | रावसाहेब दानवे |
| दिंडोरी | भास्कर भगरे | भारती पवार |
| रायगड | सुनील तटकरे | अनंत गिते |
| पालघर | डॉ. हिंमत सावरा | भारती कामडी |
| सिंधुदुर्ग | नारायण राणे | विनायक राऊत |
| जळगाव | स्मिता वाघ | करण पवार |
| सांगली | विशाल पाटील (अपक्ष) | चंद्रहार पाटील |

# जनते, तुला सलाम

हा मजकूर लिहीपर्यंत लोकसभेचे संपूर्ण निकाल आलेले नाहीत. आजही भाजप हाच या निवडणुकीत सर्वाधिक जागा मिळवणारा पक्ष आहे. एनडीए बहुमताचा म्हणजे २७२ चा आकडा पार करील अशी लक्षणे दिसत आहेत. म्हणजेच देशात त्यांचीच सत्ता येईल असे दिसत आहे. मात्र येणारी सत्ता ही भाजप आणि त्याच्या मित्र पक्षाची असेल. ही एकट्या नरेंद्र मोदींची सत्ता नसेल. मंगळवारच्या या निकालात एक गोष्ट नक्की झाली आहे. गेल्या दहा वर्षांपासून या देशात नरेंद्र मोदी हा अजिंक्य, अभेद्य गड आहे असे जे वातावरण तयार झाले होते ते खलास झाले आहे. या संदर्भात चार जून हा भारतीय लोकशाहीच्या वाटचालीत एक ऐतिहासिक दिवस म्हणून कायमचा नोंदला जाईल. मोदी है तो मुमकीन है हा एक गर्वोन्मत्त उद्‌गार होता. जोवर यश मिळत होते तोवर या उद्‌गाराला आव्हान देणारा मूर्ख आहे असे समजले जात होते. शनिवारी एक्झिट पोलचे जे अंदाज आले तोदेखील या गर्वोन्मत्त उद्‌गाराचाच एक आविष्कार होता. सर्वच वाहिन्यांनी भाजपला तीनशे ते साडेतीनशे जागा दिल्या होत्या. ज्या कोणी त्याविषयी शंका व्यक्त केल्या त्यांना अडाणी ठरवले गेले. मिडिया तर मोदींना राज्यावर बसवण्यासाठी इतका उतावीळ होता की मोदींच्या तिसऱ्या कार्यकाळात काय योजना आखल्या जाणार आहेत याची चर्चा त्यांनी सुरू केल्या होत्या. मोदी कन्याकुमारीहून परतल्यानंतर कसे बैठका घेऊ लागले आहेत याची वर्णने सुरू झाली होती. मंगळवार दुपारनंतर ते हास्यास्पद वाटू लागले आहे. अजूनही मोदी किंवा भाजप कदाचित सत्तेत येतील. ते त्यांच्या योजना राबवतीलही. पण आता त्यांच्यासमोर एक भक्कम विरोधी पक्ष असेल. फेब्रुवारीमध्ये प्रचार सुरू होण्यापूर्वी मला यंदाच्या निवडणुकीमध्ये समोर कोणीच दिसत नाही असे तुच्छतापूर्ण उद्‌गार मोदी यांनी काढले होते. चार जूनने त्यांना हे शब्द गिळायला लावले आहेत.

## अहंकाराला तडाखा

संध्याकाळी सुमारे चार वाजेपर्यंत इंडिया आघाडीला २३० च्या आसपास जागा मिळाल्या होत्या. पण त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे भाजप बराच काळ २४० वर अडकून पडला आहे. गेल्या वेळी भाजपला ३०३ जागा होत्या. त्यापेक्षा सुमारे साठ जागा घटल्या आहेत. २७२ हा बहुमताचा आकडादेखील ते गाठू शकणार नाहीत असे सध्याचे चित्र आहे. मोदींनी त्यांच्या खास शैलीत अबकी बार चारसो पार अशी घोषणा केली होती. शिवाय, चारशे हा आकडा देऊन आपण विरोधकांना त्याच्यातच कसे अडकवून ठेवले अशी शेखी मिरवत होते. त्यांची खिल्ली उडवत होते. आपल्या जागा कमी होऊ शकतील असा विचारही ते करीत नव्हते. स्वतःच्या करिश्म्याविषयी त्यांना इतका भरवसा होता की जनतेतील असंतोष त्यांना जाणवत नव्हता. त्यातच त्यांनी आसपास सर्व होयबा जमवून ठेवले होते. मिडियाला स्वतःच्या भजनी लावले. त्यामुळे जमिनीवरचे चित्र वा वास्तव मोदींपर्यंत पोचण्याचे सर्व रस्ते बंद झाले होते. त्यांचा सर्व प्रचारही याच उन्मत्तपणाचे दर्शन घडवणारा होता. काँग्रेसला पूर्वीइतक्याही जागा मिळणार नाहीत असे ते म्हणत होते. महाराष्ट्रात येऊन राष्ट्रवादी आणि शिवसेना यांना नकली पक्ष म्हणणे, शरद पवार यांना भटकता आत्मा म्हणणे असे उद्योग त्यांनी केले. दुसरे म्हणजे सर्व प्रचार मोहिम त्यांनी केवळ आणि केवळ मोदी या व्यक्ती व नावाभोवती केंद्रीत ठेवली. भाजपच्या सर्व पोस्टर्सवर देखील केवळ मोदींचा फोटो व नाव होते. उत्तर प्रदेशसारख्या राज्यात देखील योगी आदित्यनाथांचा फोटो तेथे नव्हता. मोदींच्या या अहंमन्यतेला आणि हुकुमशाही प्रवृत्तीला जनतेने जबरदस्त तडाखा दिला आहे. असे काही घडू शकेल यावर लोकांचा विश्वास कमी होऊ लागला होता. विशेषतः अनेक पत्रकारांनी ज्या रीतीने फितुरी केली त्यामुळे तर विरोधी पक्षांच्या मतांना व कृतींना स्थान मिळणेही बंद झाले. त्यातून विरोधक हे निकम्मे आहेत व मोदींचा भाजप हाच एक सक्षम पक्ष आहे असा ग्रह तयार झाला होता. आज अखेर जनतेनेच तो उद्‌ध्वस्त केला आहे.

## जनतेतूनच प्रत्युत्तर

महाराष्ट्रातील यंदाची निवडणूक तर अधिकच ऐतिहासिक होती. गेल्या दोन वर्षात भाजप नेत्यांनी येथील पक्ष फोडून जो काही हैदोस घातला होता त्याबाबत जनतेत प्रचंड असंतोष होता. तो व्यक्त होणार याबाबत विरोधकांना खात्री होती. मात्र ती खात्री प्रत्यक्षात उतरणे हे त्यांचे मनोधैर्य उंचावण्यासाठी आवश्यक होते. ते आज घडले आहे. महाविकास आघाडीतील सर्व पक्षांनी एकत्रित राहून आणि अत्यंत चिकाटीने जोरदार लढत दिली. साधनसंपत्ती, माणसे या सर्वच आघाड्यांवर त्यांच्यापुढे अनेक आव्हाने होती. पण शरद पवार, उद्धव ठाकरे व काँग्रेस नेत्यांनी एकत्रितरीत्या ते उत्तम पेलले. शेतकरी कामगार पक्षाचे जयंत पाटील यांनी सर्व प्रागतिक पक्षांना एकत्र ठेवण्यासाठी पूर्वीच पुढाकार घेतला होता. या पक्षांनी नंतर आघाडीशी जोडून घेतले. मोदींच्या एकाधिकारशाहीला विरोध हे सूत्र त्यांनी कायम ठेवले व आपल्या लढाईला फाटे फूटू दिले नाहीत. याच रीतीने उत्तर प्रदेशात अखिलेश यादव यांचा समाजवादी पक्ष व काँग्रेस यांनी एकत्रित लढा दिला व त्यातून भाजपच्या बलाढ्य वाटणाऱ्या साम्राज्याला हादरा दिला. बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांना संपवण्यासाठी भाजपने सर्व ताकद पणाला लावली. मात्र त्यांनीही पुन्हा एकवार जिद्दीचे दर्शन घडवले. मोदींनी आपल्या प्रचारात हिंदू विरुध्द मुस्लिम असे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला. एखाद्या पंतप्रधानाला हे शोभणारे नव्हेत. विरोधक याबाबत सतत बोलत होते. पण यावर जनतेने शिक्कामोर्तब करणे हे अतीव महत्वाचे होते. कारण आपल्याला जनतेचा पाठिंबा आहे असा दावा करून मोदी आपले राजकारण पुढे रेटू पाहत होते. त्याला जनतेतूनच प्रत्युत्तर मिळणे हे गरजेचे असते. भारतीय जनतेने आपण सजग आहोत हे दाखवून दिले आहे. हे जनते तुला सलाम.

विचार

# पंजाब, केरळला भोवतीये आर्थिक बेशिस्त

***राज्यांना उत्पन्न, कर्ज, वेतन, विकासकामांसाठी पैसा, भांडवली खर्च आदींचा हिशेब करून आर्थिक नियोजन करायचे असते. कर्ज काढणे आणि कल्याणकारी योजनांवर खर्च करणे वाईट नसते; परंतु कर्जाचा योग्य उपयोग करणे आणि ते वेळेत फेडणेही आवश्यक असते. तसेच मतांसाठी सवंग लोकप्रियतेच्या योजना जाहीर करताना वित्तीय शिस्त धाब्यावर बसवणे चुकीचे ठरते. केरळ आणि पंजाबमध्ये हे पहायला मिळत आहे.***

**नंदकुमार काळे**

गेल्या सहा महिन्यांमध्ये पंजाब आणि केरळच्या आर्थिक स्थितीबाबत येणाऱ्या बातम्या आणि सर्वोच्च न्यायालयाने त्यासंदर्भात दिलेले निकाल पाहिले तर या दोन राज्यांच्या आर्थिक शिस्तीबाबत सखोल विश्लेषण तसेच धोरणात्मक हस्तक्षेपाची गरज तीव्रतेने जाणवते. अर्थात आर्थिक बेशिस्तीचे संकट १९९० च्या दशकातील नवउदारमतवादी आर्थिक धोरणांमुळे विकास दर मंदावू लागल्यानंतर अधिकाधिक बिकट होऊ लागते. पण असे असूनही उदारीकरणानंतरच्या टप्प्यात कोणत्याही सरकारने यामागील कारण शोधण्याचा आणि आव्हानांवर मात करण्यासाठी योग्य ते धोरण तयार करण्याचा प्रयत्न केला नाही. सहाजिकच प्रचंड प्रमाणातील सार्वजनिक कर्ज, अनियंत्रित खर्च, कल्याणकारी बजेटच्या भूलथापा आणि मोफत सेवांवरील खर्च या सर्व गोष्टींमध्ये वाढ झाल्यामुळे या सदोष दृष्टिकोनाचे चिंताजनक परिणाम समोर येऊ लागले. पुढे पुढे भांडवली खर्च अत्यंत कमी होत गेला. त्यामुळेच वित्तीय तूट विहित मर्यादेपेक्षा जास्त होत असल्याचे समजल्यानंतर धोरणांद्वारे अतिरिक्त संसाधन एकत्रीकरणावर बंदी घालण्यात आली होती.

या पार्श्वभूमीवर बघता अलिकडेच सर्वोच्च न्यायालयात केरळ राज्याच्या याचिकेला उत्तर देताना हे राज्य आर्थिकदृष्ट्या सर्वात आजारी राज्यांपैकी एक असल्याचे केंद्र सरकारने सांगितले आहे. आर्थिक व्यवस्थेत ढवळाढवळ करून केंद्र सरकार राज्याला गंभीर नुकसानीकडे ढकलत असल्याचा आरोप केरळ सरकारने केला होता. कोणत्याही राज्याला अर्थसंकल्प आणि कर्जाच्या माध्यमातून आर्थिक व्यवस्था स्थापित करण्याचा अधिकार आहे, असे केरळ सरकारने याचिकेत म्हटले होते. त्याचबरोबर राज्याला गरिबीकडे नेणारे नियम केंद्र सरकारने केले असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले होते. याला उत्तर देताना केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की केरळला गैरव्यवस्थापनामुळे आर्थिक समस्यांचा सामना करावा लागत असून ते आर्थिकदृष्ट्या सर्वात जास्त आजारी राज्यांपैकी एक आहे. यावेळी केरळच्या आर्थिक व्यवस्थापनात अनेक त्रुटी असल्याचेही केंद्र सरकारने म्हटले. केरळला आपली कर्ज घेण्याची मर्यादा वाढवायची नाही. पण त्यांना विकासकामे करायची आहेत. आता मात्र नियमित जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी त्यांना कर्ज हवे आहे. कोणतेही राज्य सरकार कर्ज काढते त्या वेळी वित्तीय संस्था राज्याच्या वित्तीय क्षमतेचा, कर्जफेडीचा आणि कर्ज-व्याज, उत्पन्न, नफा यांचे प्रमाण तपासते. राज्य सरकारचे सकल उत्पन्न लक्षात घेऊन त्याच्या काही पटीत कर्ज दिले जाते. केंद्र सरकार अशा कर्जांना थकहमी देते.

केरळ सरकारच्या बाबतीत केंद्र सरकारने म्हटले आहे की सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या तुलनेत राज्याचे दायित्व सातत्याने वाढत आहे. २०१८-१९ मध्ये ते ३१ टक्के होते. दोन वर्षांमध्ये वाढून ते ३९ टक्के झाले. दुसरीकडे, इतर राज्यांचे सरासरी दायित्व फक्त ३० टक्के आहे. महाराष्ट्रासारख्या राज्यावर जास्त कर्ज असले तरी ते त्याच्या दायित्वाच्या १८ टक्के आहे. त्या तुलनेत केरळचे दायित्व दुपटीहून जास्त आहे. त्यामुळे केंद्र सरकारने नाराजी व्यक्त करणे स्वाभावीक आहे.

केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात सांगितले की केरळच्या मोठ्या दायित्वामुळे त्यांना व्याजाचा भारही सहन करावा लागतो. त्यामुळे केरळ राज्य कर्जाच्या जाळ्यात अडकत असून तूट वाढत आहे. केरळच्या महसुलाच्या तुलनेत पायाभूत सुविधांवरील खर्चातही वाढ होत आहे. २०१८-१९ मध्ये हा खर्च ७४ टक्के होता. तो आता ८२ टक्के झाला आहे. अशा स्थितीत पायाभूत सुविधा उभारण्यासाठी कर्ज घेतल्यामुळे हे राज्य दीर्घकालीन कर्जाच्या गर्तेत अडकत आहे. हे आर्थिक संकट लवकर संपणार नाही. राज्याची महसुली तूट सर्वाधिक आहे. कोणत्याही उत्पादक योजनेत पैसे गुंतवण्याऐवजी राज्याला नियमित कामासाठी कर्ज घ्यायचे असून त्यामध्ये पगार, पेन्शन आणि व्याज आदी खर्च भागवण्याचा समावेश आहे. थोडक्यात, अशा ढिलाईच्या धोरणामुळेच तेथे मोठ्या आर्थिक संकटांना आमंत्रण मिळताना दिसत आहे. अशी स्थिती प्रथम सरकारी सेवा आणि नंतर सामाजिक आणि आर्थिक विकासाला हानीकारक ठरते.

दुसरीकडे पंजाबचे वाढते सार्वजनिक कर्ज हेदेखील सर्वात त्रासदायक आर्थिक दुष्टचक्र ठरत आहे. गेल्या अर्थसंकल्पात या राज्याचे थकित कर्ज ३.४ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त किंवा सकल राज्य देशांतर्गत उत्पादनाच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त असल्याचा अंदाज होता. हे उच्च गुणोत्तर वित्तीय शाश्वतीसाठी वाईट आहे. सरकार आपली कर्जे फेडू शकत नसल्यास सार्वजनिक कर्ज वाढवते. त्यामुळे अर्थव्यवस्था दुष्टचक्रात अडकते. या पार्श्वभूमीवर बघता राज्यातील वर्तमान सरकारने सुमारे ४७ हजार कोटी रुपयांचे कर्ज घेतले असून त्यापैकी ५७ टक्के किंवा २७ हजार कोटी रुपये पूर्वीच्या कर्जावरील व्याज भरण्यासाठी खर्च केले. मोफत वीज, मोफत पाणी यासारख्या अनेक घोषणा राज्ये जाहीर करीत असतात. परंतु त्यासाठी आधी तिजोरीचा सल्ला घ्यावा असे त्यांना वाटत नाही. सार्वजनिक कर्जावरील अत्याधिक अवलंबित्व अर्थव्यवस्थेला अपंग बनवते तर कर्ज सेवा (मुद्दल आणि व्याजाचे पेमेंट) प्रतिबद्ध खर्चाची जलद वाढ विकास आणि भांडवली प्रकल्पांना बाधा आणते. असे असताना १५ व्या वित्त आयोगाने आर्थिक वर्ष २०२५-२६ पर्यंत सर्व राज्यांसाठी राज्याच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३२.५ टक्के सार्वजनिक कर्जमर्यादेची शिफारस केली आहे.

पगार, वेतन, निवृत्तीवेतन, सेवानिवृत्तीचे फायदे आणि व्याज देयके यावरील खर्च राज्याच्या महसुलातील मोठा हिस्सा आधीच काढून घेतो. २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात हा खर्च एकूण महसूल प्राप्तीच्या ७५ टक्के असण्याचा अंदाज आहे. वीज अनुदान, कल्याणकारी योजना आणि मोफत सेवा योजनांसाठीचा हा खर्च राज्यांच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ऐंशी टक्क्यांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे विकासासाठी खूप कमी संसाधने शिल्लक राहतात. विकास प्रकल्पांचा पाया असणाऱ्या भांडवली खर्चाला राज्याच्या अर्थसंकल्पात प्राधान्य मिळत नाही. २०२१-२२ मध्ये भांडवली खर्च एकूण खर्चाच्या ६.३८ टक्के होता तर २०२३-२४ च्या बजेटमध्ये तो ५.२७ टक्क्यांवर आला असण्याचा अंदाज आहे. आर्थिक वाढीसाठी अत्यंत कमी भांडवली खर्च योग्य नाही. वित्तीय तूट राज्याच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ४.७७ टक्के होती आणि २०२३-२४ मध्ये ती ४.९८ टक्के राहण्याचा अंदाज आहे. 'पंजाब फिस्कल रिस्पॉन्सिबिलिटी अँड बजेट मॅनेजमेंट' (एफआरबीएम) कायदा २००३ अंतर्गत, विहित मर्यादा तीन टक्के आहे. लागोपाठ आलेल्या अर्थमंत्र्यांनी अतिरिक्त संसाधने उभारण्यासाठी कोणतेही नवीन कर प्रस्तावित केले नाहीत. तात्काळ दायित्वे निकाली काढण्यासाठी नंतर ते लागू केले. मात्र या नवीन कर धोरणाच्या एकत्रित परिणामामुळे आर्थिक संकट निर्माण झाले. वित्तीय मापदंड निर्धारित मर्यादेत आणण्यासाठी पंजाबला महसूल वाढवणे, खर्चावर अंकुश ठेवणे आणि गरजा तर्कसंगत करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी महसूल स्रोतांच्या पूर्ण क्षमतेचा वापर करून अतिरिक्त संसाधने एकत्रित करण्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक होते.

कर महसुलाच्या आघाडीवर बघायचे तर पंजाबमध्ये भरपूर क्षमता आहे. २०१५-१६ आणि २०२०-२१ दरम्यान त्यांच्या 'जीएसडीपी'चे प्रमाण ६.१ टक्के होते. सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या राज्यांच्या अनुषंगाने उच्च कर महसुलासाठी हे प्रमाण ७.५ टक्के असावे. यासाठी राज्याने नवीन कर लागू करावे, कराचा आधार वाढवावा, कर अनुपालन सुधारावे आणि डिजिटल-चालित सुधारणांचा वापर करावा, असे अपेक्षित होते. गैर-कर महसुलातून संसाधने तयार करण्यासाठी वापरकर्ता शुल्क वाढवावे, सार्वजनिक-खासगी भागीदारीची कामगिरी सुधारावी, निर्गुंतवणूक हाती घ्यावी आणि मालमत्तेतून कमाई करावी अशा सूचना होत्या.

पंजाबने गरिबांसाठी अनुदाने मर्यादित करून आपला वचनबद्ध आणि विनामूल्य सेवा खर्च हळूहळू महसूल प्राप्तीच्या ६० टक्क्यांपर्यंत कमी केला पाहिजे. कृषी क्षेत्रासाठी 'पाणी वाचवा, पैसे कमवा' योजनेसारख्या कल्पना राबवायला हव्यात. त्या वीज सबसिडी स्थिर करण्यास आणि शाश्वत पाणीवापराला प्रोत्साहन देण्यासही मदत करू शकतात. शून्य आधारित बजेटिंगची सुरुवात करणे आणि परिणाम उत्पादक असल्यासच बजेटमध्ये समाविष्ट करणे हे पथ्य पाळले तर त्यांचा अनुत्पादक खर्च कमी होऊ शकतो. परंतु या पातळीवर सदर दोन्ही राज्यांनी काहीच केलेले दिसत नाही. त्यामुळे त्यांच्याभोवतीचा आर्थिक फास आवळताना दिसतो आहे.

आजकाल

# या महाराष्ट्रात जीव घुसमटतो आहे

**दिलीप जोशी**

शांडिल्यगोत्री गोऱ्यापान, घाऱ्या डोळेवाल्या अत्यंत बुद्धिवान, तीन चार पाच पिढ्यां डॉक्टर्स वकील आणि इंजिनिअर्स असलेल्या अत्यंत सुखवस्तू, श्रीमंत, स्वत:चा भला मोठा बंगला, गाडी, अर्धा डझन नोकरचाकर असलेल्या कोकणस्थ चित्पावन ब्राह्मण घराण्यात माझा जन्म झाला. गोऱ्या घाऱ्या नातेवाईकांचा भलामोठा गोतावळा लग्नामुंजीत, सत्यनारायण सत्यविनायकाच्या पूजेत लफ्फेदार भर्जरी शालू नथी घालून वेळोवेळी एकत्र जमायचा, चांदीच्या जाडजूड ताटवाट्यांतून चांदीच्या चमच्यांनी पंचपक्वान्नांच्या व अत्तरांच्या सुगंधित घमघमाटाने भरलेल्या घरात बसून सनईच्या कर्णमधूर सुरांनी भारून जाऊन थट्टाविनोद करत प्रसन्न हास्याची कारंजी उडवीत मोठमोठ्या पंगतीत बसून जेवायचा.

पण तरीही मला आपण उच्चभ्रू सवर्ण आहोत याचे विषारी बीज आमच्या अत्यंत उच्चशिक्षित, परोपकारी आईवडिलांनी माझ्या मनात कधी रुजवलेच नाही. इतरांसाठी झिजण्यातच आयुष्याचे सार्थक आम्ही नेहमी मानत आलो. आंबेडकर माझ्या बॅरिस्टर आजोबांचे मित्र होते. मुंबईला आजोबांकडे येत असत आजीच्या हातच सुंदर स्वयंपाक जेऊन जात असत. नानी पालखीवाला आजोबांचे विद्यार्थी होते. आजोबा टाटांचे कायदा सल्लागार होते. भारताचे प्रख्यात अर्थतज्ज्ञ व रिझर्व बँकेचे गव्हर्नर, प्रख्यात इंजिनीअर सर विश्वेश्वरैय्या, माजी राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद आमच्या रोह्याच्या घरी येऊन गेले आहेत. घरी अत्यंत सोज्वळ, शैक्षणिक वातावरण होतं. वैचारिक चर्चा होत असत. पण कधी कुणाचा आवाज चढल्याचे ऐकले नव्हते. कधी कुणाची आसूया, द्वेष, मत्सर करणे वगैरे माहीतच नव्हते.

वडिल आणि मोठा भाऊही पायलच्याच टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेज, म्हणजे नायर हॉस्पिटलमधे शिकून एम बी बी एस व एम डी झाले. पण आजूबाजूच्या असंख्य लोकांची जात धर्म विचारावा असं कधी मनातच आलं नाही. किंबहुना असा काही प्रकार असतो हेही माहीत नव्हतं.

रात्री अपरात्री, खेड्यापाड्यांतून, बैलगाडीत बसून पेशंट्स येत असत. अण्णांचा दवाखाना सर्वांसाठी सर्वकाळ उपलब्ध असे. रात्री येणाऱ्या पेशंटचे मुख्यत्वे दोन प्रकार असत, साप चावलेले व प्रसूती अडलेले. त्यांची जातपात, पैसे आहेत की नाही असल्या फालतू चौकशा न करता अण्णा त्यांचे प्राण वाचवण्यासाठी जिवाचे रान करीत. कितीतरी ऑपरेशन्स मी अगदी ८-९ वर्षांचा असल्यापासून जवळून पाहिली आहेत. काहीवेळा रोह्यातल्या सुविधा पुरेशा न पडल्यास व बेरात्री ड्रायव्हर न मिळाल्यास अण्णा स्वत: गाडी चालवून पेशंटला मुंबईला घेऊन जात. त्यांच्याएवढी फास्ट गाडी चालवणारे पंचक्रोशीत कुणी नव्हते. पण त्यांनी कधीही ॲक्सिडंटच काय पण कुणाला छोटासा धक्काही लागू दिला नाही. मुंबईतील डॉ. टिब्रेवाला, डॉ. सोनावाला, डॉ. पुरंदरे, अमोणकर, आजगावकर, डॉ. के के दाते, डॉ. ठाकूर यासारखे अग्रगण्य डॉक्टर्स अण्णांचे मित्र होते. माझ्या मोठ्या भावाचा - डॉ. अरविंद जोशी याचा जन्म डॉ. ठाकूरांनी घडवला होता. डॉ. ठाकूर म्हणजे सुनिताबाई देशपांड्याचा भाऊ, पु.लं. चा मेहुणा. मुंबईतले विख्यात ईएनटी सर्जन डॉ. सुधाकर साने व त्याचा मोठा भाऊ रेडिऑलॉजिस्ट डॉ. शशिकांत साने माझे सख्खे आत्तेभाऊ.

हे आत्मपुराण अजून खूपखूप लांबू शकतं आणि त्याला आत्मप्रौढीचा, अहंमन्यतेचा, दांभीकतेचा, गर्वाचा दर्प येऊ शकतो. म्हणून इथेच थांबतो. हे सर्व अप्रासंगिक वाटले तरी इथे सांगण्याचे कारण हे की अशा वातावरणातही आमच्या परिवाराला कधीही दुरूनही किंवा पुसटताही अहंमन्यतेचा, उच्चभ्रू सवर्णतेचा, दंभाचा, राजकारणाचा स्पर्श झाला नाही.

कोकणात आणि मुंबईत तसं वातावरणच नव्हतं. सज्जनतेचा, प्रामाणिकपणाचा, शिक्षणाचा आदर केला जायचा. पैसा हा विषयच कधी नसायचा. अण्णांची लाखो रूपयांची पेशंटकडील थकबाकी वसूल करण्याची त्यांना कधी गरजच वाटली नाही. पेशंट वाचला हाच आनंद मोठा असे. पुष्कळदा पदरचे पैसे खर्च करूनही ते लष्करच्या भाकऱ्या भाजत असत. कधीकाळी आम्ही एकत्र सिनेमा पाहायला गेलो तर सिनेमा सुरू होऊन दहा मिनिटे होतायत न होतायत तोवर थिएटरचा मालक/मॅनेजर सिनेमा चालू असताना पडद्यावर स्लाईड सूपरइंपोझ करायचा, ''डॉ. जोशींचा पेशंट बाहेर वाट बघत आहे.'' मग अण्णा बाहेर गेले की एकदम सिनेमा संपल्यावर आम्हाला घरी घेऊन जायलाच परत यायचे. १९७९ पासून मी बंगलोरमधे स्थायिक झालो. पुढे २००६ पासून ऋषि व्हॅली स्कूलमधे. या सर्व ठिकाणी नेहमी अत्यंत बुद्धिमान, तर्कनिष्ठ, निष्पक्षपाती, समताप्रिय, समाजातच कायम राहिलो. तिथून जळगावात येईपर्यंत एका स्वप्नवत निरागस दुनियेतच राहून वयाच्या साठीच्या ऊंबरठ्यावर पोचलो होतो. जगात सगळे सज्जन सुविद्य समजूतदार इतरांसाठी झिजणारेच लोकच असतात हा माझ्या भ्रमाचा ५७ वर्षे वाढत राहिलेला प्रचंड मोठा भोपळा धडामकन फुटला. खूपच धक्का बसला. मोठ्याभाऊंनी सावधानतेचा इशारा दिला होता, ''जोशीसाहेब तुम्हाला इथे कल्चरल शॉक लागेल'' तरीही मी बेसावधच होतो. लहानपणी ''रिप व्हॅन विंकल'' नांवाच्या चुकून एका गुहेत जाऊन २० वर्षे झोपून राहिलेल्या माणसाची गोष्ट आठवली. २० वर्षांनंतर तो जेव्हा आपल्या गावात परत येतो तेव्हा सारेच बदलून गेलेले असते. कुणीच त्याला ओळखत नाही. गावातले सौहार्द्र, जिव्हाळा, माणूसकी, नीतीमत्ता हरवलेली असते.

आमचं तसंच काहीतरी झालंय. मी तर जवळजवळ ३० वर्षांनी, तोही महाराष्ट्राच्या मराठीही धड येत नसलेल्या एका पूर्णपणे अपरिचित, अविश्वसनीयपणे भिन्न असलेल्या भागात, पैशालाच ईश्वर मानणाऱ्या सामाजिक वातावरणात आलो आहे. कदाचित साऱ्या महाराष्ट्रातच काय पण जगातलच वातावरण या ३० वर्षांत असं बदलून, बिघडून गेलं असावं. मला कालप्रवासी असल्यासारखं एका वेगळ्याच कालखंडात आल्यासारखं, परग्रहावर आल्यासारखं वाटतय. जीव घुसमटतोय. माणूसकी, संवेदनक्षमता, न्यायाची चाड, नीतिमानता सगळं संपून गेलंय का या जगात. क्षमा करा. खूप भरकटलोय. पण व्यक्त होण्यावाचून गत्यंतर नव्हतं. नाहीतर मन फाटून गेलं असतं. डोक्याचा विस्फोट झाला असता.

डॉ. पायल तडवी यांचा त्यांच्या जातीमुळे किंवा जातीच्या नावाने मिळणाऱ्या आरक्षणामुळे झालेला उद्वेगजनक मानसिक छळ आणि तो असह्य झाल्यामुळे त्यांनी केलेली दुर्दैवी आत्महत्या याने व्यथित झालेल्या मनातील उद्रेकामुळे हे सारे उफाळून बाहेर आले.

**साभार**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**५ जून**

**१८८१ :** पेटीवादक आणि लेखक म्हणून नावलौकिक मिळवणाऱ्या गोविंदराव टेंबे यांचा जन्म ५ जून १८८१ रोजी झाला. आपल्या अलौकिक पेटीवादनाने संगीताच्या क्षेत्रात पेटी या वाद्याला स्वतंत्र दर्जा त्यांनी प्राप्त करून दिला. रसिकाग्रणी गाविंदरावांनी आपल्या पेटीवादनातून गायकीचा भास निर्माण करण्यात त्यांचा हातखंडा होता. स्वरांचे नर्तन आणि बोल काढण्याऱ्या पेटीवादनाबरोबरच गायक, संवाद, पदे, लेख, चरित्र आणि पुस्तकही लिहिणारे गोविंदराव हे एक बहुगुणी आयामी व्यक्तिमत्व, गंधर्व नाटकमंडळींच्या 'कच्चा' पासून ते पटवर्धन-तुलसीदासापर्यंतच्या नाटकात तसेच अयोध्येचा राजा आणि मायामच्छिंद्र या सिनेमात ते गायलेदेखील. 'मानापमान', 'विद्याहरण' या नाटकातील पदांना त्यांनी चाली लावल्या. याशिवाय अनेक चित्रपटात पदे आणि संवादही लिहिले. त्यांनी लिहिलेले अल्लादिया खाँचे चरित्रही गाजले. 'कल्पना संगीत' हे त्यांचे आणखी एक गाजलेले पुस्तक, गायक भास्करबुवा बखले, अल्लादिया खाँ, पेटीवादक भाचूभाई भांडारे यांना त्यांनी आपले गुरु मानले. 'माझा संगीत व्यासंग' आणि 'माझा जीवनविहार' ही त्यांची पुस्तके म्हणजे त्यांचे आत्मचरित्र. ऑगस्ट १९५५ मधे हा रसिकाग्रणी पेटीवादक- हा गायक आणि साहित्यिक अनंतात विलीन झाला. अनेक क्षेत्रात ते पहिले म्हणून गाजले. त्यामध्ये नाट्य संगीताचे पहिले शिल्पकार, पहिल्या मराठी बोलपटाचे संगीत दिग्दर्शक, संगीत क्षेत्रातील पहिले सौंदर्य मीमांसक आणि संगीतिकांचे पहिले प्रवर्तक म्हणून गोविंदराव राहिले. ९ ऑगस्ट १९५५ रोजी त्यांचे निधन झाले. **१८८१:-** संगीतकार, थोर पेटीवादक आणि संगीतसमीक्षक गोविंदराव टेंबे यांचा जन्म. 'माझा संगीत व्यासंग' आणि 'माझा जीवनविहार' ही त्यांची आत्मपर पुस्तके, तसेच त्यांच्या स्फुट लेखांचे संग्रहदेखील प्रकाशित झाले होते. **१९१३:-** ख्यातनाम साहित्यिक प्रभाकर तुकाजी दिघे यांचा जन्म. 'अर्क', 'एन्काउंटर', 'धूर', 'धुंदी', 'फुलनदेवी', 'फुले' मिळून २५ एक कादंबऱ्या. 'पंचधारा' मधून जगातील पाच कर्तव्यगार स्त्रियांची चरित्रे, तसेच 'विज्ञान सप्तर्षी' आणि 'डॉ. आंबेडकरांचे चरित्र' त्यांनी लिहिले. याशिवाय 'अमानुष', 'असामान्यांच्या खून कथा', 'वेध', 'शोध', 'सामना', 'सूड' मिळून २५ हून अधिक कथासंग्रह, ह्याशिवाय 'आत्मा संमोहनविद्या', 'जगात कसे वागावे?', 'पिशाच्य विद्या', 'शतायुषी कसे व्हावे?' मिळून दहाहून अधिक मानसशास्त्र विषयक ग्रंथ आणि पदवी परीक्षेनंतर कोर्सेस यावर त्यांनी पुस्तके लिहिली आहेत. **१९१८:-** कौटुंबिक कलहाची कहाणी सांगणारे 'पटावरील प्यादे' या सडेतोड आत्मकथनाच्या कर्त्या यमुनाबाई विनायक खाडिलकर यांचा जन्म. 'संध्याकाळ' या सायंदैनिकाच्या त्या व्यवस्थापिका होत्या. नाट्याचार्य खाडिलकरांच्या जन्मशताब्दीस 'वटवृक्षाच्या छायेत' हे पुस्तकही त्यांनी लिहिले होते. **१९२२:-** ज्येष्ठ पत्रकार गोपाळराव पटवर्धन यांच्या लेखनाची सुरूवात 'मन्वंतर' मधून झाली. कालांतराने त्यांनी 'तरुण भारत', 'विशाल सहयाद्री', 'गावकरी', 'प्रभात', 'लोकशक्ती' आदी वृत्तपत्रांमध्ये काम केले. 'केसरी' मध्येही त्यांनी काही काळ लेखन केले. 'पानशेत धरण फुटण्याची शक्यता असून, त्याचा पुण्याला धोका असल्याची' पहिली बातमी गोपाळरावांनी दिली होती. १९५२ पासून झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीची वार्तापत्रे त्यांनी लिहिली होती. निष्पक्ष वार्तापत्रे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. **१९३३:-** कवी, समीक्षक भास्कर जनार्दन कविमंडल यांचा जन्म. तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक असणाऱ्या कविमंडल यांनी या विषयावर विविध वृत्तपत्रातून लेखन केले. 'कविता' हा त्यांच्या जिव्हाळयाचा विषय. सत्यकथा, युगवाणीतून त्यांच्या कविता प्रसिध्द. कविता : स्वरुप व आस्वाद, 'चेतना', 'उज्वल', 'कवितेचा अस्त' हे त्यांचे समिक्षात्मक ग्रंथ. 'तळघरावरील पाणी' ही त्यांची दीर्घकथा तर 'चलो कलकत्ता' हा विमल मित्र यांच्या कादंबरीचा अनुवाद आणि रसेलच्या निवडक लेखांचे भाषांतर व संपादन त्यांनी केले. **१९४७:-** कादंबरी लेखक रमेश जिजाराम नेवसे यांचा जन्म. 'अघटित', 'जाणता अजाणता', 'झुंझ', 'तोल', 'मानिनी', 'मी फूल झाले' या कादंबऱ्यांसह कटकट या नियतकालिकाचे त्यांनी संपादन केले. **१९६२:-** नव्या पिढीतील एक अग्रगण्य जहाल स्त्रीवादी समीक्षिका, शोधनिबंध लेखिका, डॉ. अरुणा देशमुख यांचा जन्म. ह्यांच्या ग्रंथसंपदेत 'लौकिकवादी साहित्य विचार', 'साहित्याचे मर्मबंध', 'साहित्य संवाद', 'स्त्रीवाद : साहित्य आणि संस्कृती' अशी ग्रंथ संपदा. **१९७३:-** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक, लेखक गोळवलकर गुरुजी यांचे निधन. 'विचारदर्शन' आणि 'राष्ट्र देवो भव' ही पुस्तके त्यांच्या नावावर आढळतात. **१९८५:-** इतिहाससंशोधक गणेश हरी खरे यांचे निधन. 'श्रीविठ्ठल आणि पंढरपुर', 'मूर्तिविज्ञान', 'दक्षिणेच्या मध्ययुगीन (शके ५५२ ते १५२०) इतिहासाची साधने (३ खंड)', 'इतिहासकर्ते मराठी', 'अशी आमुची वाई' आदी ५०हून अधिक पुस्तके त्यांनी लिहिली वा संपादित केली. **२००४:-** मराठीतील आद्य 'दिनविशेष' कार डॉ. प्रल्हाद नरहर जोशी यांचे निधन. 'दिनविशेष' हे पुस्तकही त्यांचे (१९५०). त्यांच्या नावावर कादंबऱ्या, संतसाहित्याचे संपादन, मराठी साहित्य व व्याकरण अशी २५० पेक्षा जास्त पुस्तके जमा आहेत.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

५ जून

१) श्री.चिंतामण आप्पा म्हात्रे मु.कोप्रोली, अलिबाग, ५-६-१९४१
२) श्रीम.नीलिमा सुधाकर म्हात्रे वेश्वी,अलिबाग, ५-६-१९५२
३) श्री.नंदन पुंडलिक पाटील अलिबाग, ५-६-१९५४
४) श्री. संभाजी ज्ञानदेव कसबे मु.गोंधळपाडा, अलिबाग, ५-६-१९५३
५) श्रीम.सविता चंद्रकांत भिवंडे मु.थळ, अलिबाग ५-६-१९५४
६) सुधाकर नारायण किल्लेकर गोंधळपाडा, अलिबाग ५-६-१९५८
६) श्री.सदाशिव आत्माराम पाटील नवेनगर कुरूळ, अलिबाग ५-६-१९४९

# निधीअभावी मार्केटचे काम रखडले

। तळा । वार्ताहर ।

तळा शहरात होत असलेल्या मच्छी मार्केटचे काम हे निधीच्या कमतरतेमुळे गेल्या कित्येक महिन्यांपासून रखडले असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. तळा शहरातील कुरुक्कर हॉस्पिटलसमोर नवीन मच्छी मार्केटची ईमारत उभी रहात असून सुरुवातीस युद्धपातळीवर सुरू असलेल्या कामाची निधीअभावी हळूहळू गती मंदावली. गेल्या कित्येक महिन्यांपासून हे मच्छी मार्केटचे काम अपूर्ण स्थितीत तश्याच अवस्थेत आहे. या मच्छीमार्केटच्या इमारतीसाठी अंदाजित रक्कम ९१ लाख ४१ हजार ७०० रु. खर्च असून नगरोस्थान योजनेच्या माध्यमातून ५८ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. मात्र, उर्वरित रक्कम ३३ लाख ४१ हजार ७०० रुपये नगरपंचायतीला अद्याप प्राप्त झाले नसल्याने या मच्छी मार्केट इमारतीचे काम रखडले आहे.



तळा बाजारपेठेत बसस्थानकशेजारी असलेल्या जुन्या मच्छी मार्केटमध्ये योग्य सुविधा नसल्याने बहुतांश मच्छी विक्रेते मच्छी विक्रीसाठी बाहेर बसतात. यामुळेच काही दिवसांपूर्वी एसटीची धडक बसून कोसळलेल्या संरक्षक भिंतीमुळे पाच मच्छी विक्रेत्या महिला जखमी झाल्या होत्या. त्यामुळे मच्छी विक्रेत्यांना हक्काची जागा कधी मिळणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. तसेच, ज्या ठिकाणी हे मच्छी मार्केट होत आहे. त्या ठिकाणी नगरपंचायतीचे १२ भुईभाडे गाळेधारक होते. नवीन मच्छी मार्केटच्या इमारतीमध्ये पक्के १८ गाळे बांधण्यात येणार आहेत. मात्र, मच्छी मार्केटच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले नसल्याने या भुईभाडे गाळे धारकांना इतरत्र आपला व्यवसाय करावा लागत आहे. यांसह नगरपंचायतीला या गाळे धारकांकडून मिळणारे उत्पन्न देखील रखडले आहे. उर्वरित निधी लवकरात लवकर मिळावा यासाठी नगरपंचायत प्रशासनाकडून प्रस्ताव पाठविण्यात आला असून नागरी सुविधा किंवा वैशिष्ट्यपूर्ण योजनेच्या माध्यमातून निधी उपलब्ध झाला की लवकरच मच्छीमार्केट इमारतीच्या कामाला सुरुवात करण्यात येणार असल्याचे नगरपंचायत प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

# सिडको महामंडळाचे आपत्कालिन कक्ष

। पनवेल । वार्ताहर ।

अतिवृष्टीमध्ये उद्‌भवलेल्या आपत्तीवर मात करण्यासाठी सिडको महामंडळाने सालाबादाप्रमाणे नागरिकांच्या मदतीसाठी आपत्कालीन नियंत्रण कक्ष सुरू केले आहे. जून ते सप्टेंबर या महिन्यामध्ये २४ तास या नियंत्रण कक्षातून रहिवाशांना मदत केली जाणार असल्याचे सिडको मंडळाच्या जनसंपर्क विभागाने प्रसिद्धी पत्रकातून कळविले आहे. या प्रसिद्धीपत्रकात सिडको महामंडळाने पनवेल महापालिका क्षेत्रातील खारघर, कळंबोली, नवीन पनवेल, नावडे, काळुंद्रे, तळोजा, कामोठे या वसाहतींचे हस्तांतरण झाल्याने या वसाहतींना वगळून इतर सिडको वसाहतींमधील नागरिकांसाठी सिडकोचे हे आपत्कालीन नियंत्रण कक्ष मदत करेल, असेही स्पष्ट केले आहे.

सीबीडी बेलापूर येथील सिडको भवन या इमारतीच्या तळ मजल्यावरुन आपत्कालिन नियंत्रण कक्षाचे काम सुरू असणार आहे. सिडको मंडळाने दिलेल्या माहितीनुसार कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांसोबत शनिवार, रविवार तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही २४ तास हे कक्ष कार्यरत असणार आहे.


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**


## इंदुमती गावंड यांचे निधन

। खरोशी । प्रतिनिधी ।

आवरे गावच्या ज्येष्ठ नागरिक गावंड परिवाराच्या अध्वर्यू इंदुमती रामदास गावंड यांचे वयाच्या ८५व्या वर्षी अल्पशा आजाराने २ जून रोजी निधन झाले. एकादशीच्या अभ्यंग दिनी त्यांनी इहलोकातून निरोप घेतला आहे. त्यांचे अंत्यसंस्कार वैकुंठभूमी आवरे येथे करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुले, मुली, सुना, नातवंडे, जावई असा मोठा परिवार आहे.होमविधी दि. ६ जून रोजी, दशक्रिया विधी श्री क्षेत्र नाशिक येथे ११ जून रोजी, तर उत्तरकार्य विधी दि.१४ जून रोजी राहत्या घरी होईल, असे गावंड परिवारातर्फे सांगितले आहे.



# मालाड मेट्रो स्थानकाचं मोतीलाल ओसवाल नामकरण

। मालाड । प्रतिनिधी ।

खासगी सार्वजनिक भागीदारीच्या माध्यमातून मोतीलाल ओसवाल फायनान्शिअल सर्व्हिसेस या कंपनीने मुंबईच्या मालाड पश्चिम मेट्रो स्टेशनचे ब्रँडिंग हक्क विकत घेतल्याने मुंबई मेट्रो दोनवरील मालाड पश्चिम स्थानकाचे नाव बदलून मोतीलाल ओसवाल मालाड मेट्रो स्थानक असे करण्यात आले आहे. ज्याचा महाराष्ट्राशी काही संबंध नाही, महाराष्ट्राला काही योगदान नाही अशा परप्रांतीयाचे नाव मालाड



मेट्रो स्टेशनला देण्यात आल्याने तमाम मराठी भाषिकांमध्ये संताप व्यक्त होत असून मराठी लोकांच्या भावना दुखावल्या आहेत. महाराष्ट्र संरक्षण संघटना प्रणित मुंबईसह महाराष्ट्र वाचवा कृती समितीच्या माध्यमातून या घटनेच्या निषेधार्थ मूक निषेध मोर्चा काढण्यासाठी पोलीस प्रशासनाला निवेदन देण्यात आले. परंतु, ४ जूनपर्यंत लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता व जमावबंदी आदेश लागू असल्याने पोलीस प्रशासनानकडून परवानगी न मिळल्याने महाराष्ट्र संरक्षण संघटना प्रणित मुंबईसह महाराष्ट्र वाचवा कृती समितीच्या माध्यमातून संघटनेचे अध्यक्ष धर्मेंद्र घाग, उपाध्यक्ष रवींद्र शिंदे, अनिल हातेकर, सरचिटणीस उदय जागुष्टे, विभागीय पदाधिकारी अनिल जाधव आणि चेतन कोलगे यांनी मेट्रो अधिकाऱ्यांना भेटून याबाबत आपले लेखी निवेदन दिले.

## मारुती भालेराव यांचे निधन

। पाली । वार्ताहर ।

पालीचे नगरसेवक व पाणी पुरवठा सभापती सुधीर भालेराव यांचे वडील सुधागड तालुका बौद्धजन पंचायतचे मध्यवर्ती कमिटीचे माजी उपाध्यक्ष व आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते मारुती पिठाजी भालेराव यांचे दि.२८ रोजी वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झाले.



भालेराव हे अतिशय मनमिळाऊ व मीतभाषी स्वभावाचे होते. आंबेडकरी चळवळीत काम करीत असताना त्यांचा अनेक आंदोलनात सहभाग होता. तालुक्यातील प्रत्येक सुख दुःखाच्या कार्यक्रमात ते सहभागी असायचे. बौद्धजन पंचायतीच्या ग्रुप शाखेचे ते अध्यक्ष देखील राहिले आहेत. फुले शाहू आंबेडकरांच्या विचारांचे पाईक असलेले मारुती भालेराव हे सामाजिक व धार्मिक कार्यक्रमात अहोरात्र झटत असत. त्यांच्या अंत्याविदधीला नातेवाईकांसह मुंबई, ठाणे, पुण्यासह सुधागड तालुक्यातून विविध क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती. त्यांच्या पश्चात मुले, मुली, सूना, नातवंडे, भाऊ असा परिवार आहे. त्यांची शोकसभा व जलदान विधीचा कार्यक्रम राहत्या घरी दि.९ जून रोजी सकाळी ११.३० वा आयोजित करण्यात आला आहे.

# थोर महापुरुषांच्या वाचनाने अभ्यासात एकाग्रता

## यूपीएससी उत्तीर्ण प्रशांत भोजने यांचे प्रतिपादन

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

युपीएसी परीक्षेचा अभ्यास करीत असताना तथागत गौतम बुद्ध, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व इतर थोर समाजसुधारक महापुरुषांचे वाचन करुन अभ्यास करण्याची एकाग्रता व आवड निर्माण झाली असल्याचे प्रतिपादन यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झालेले प्रशांत सुरेश भोजने यांनी केले. सुधागड तालुक्यासह रायगड, मुंबई, ठाणे जिल्ह्यातील विविध भागात भोजने यांचा सत्कार केला तसेच, कौतुक सोहळा पार पडत आहेत. येथील ग्रामपंचायत वाघोशी व आदर्श नगर भेरव यांच्यावतीने सत्कार करण्यात आला.

प्रशांत भोजने म्हणाले, जीवनात काही बनायचे असेल तर फक्त दहावी, बारावी किंवा ग्रॅज्युएशनपर्यंत मर्यादित राहू नका, तर त्यापुढे शिका एमपीएससी,



यूपीएससी सारख्या स्पर्धा परीक्षा द्या. त्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने चालत असलेली बार्टी ही संस्था आपल्याला स्कॉलरशिप देते त्याचा फायदा घेण्याचे आवाहन देखील प्रशांत भोजने यांनी केले.

ठाणे येथील नागसेन नगर सारख्या कामगार वसाहतीत राहून यूपीएससी परीक्षा प्रशांत भोजने यांनी उत्तीर्ण करुन आई वडिलांचे स्वप्न साकार केले. यासाठी प्रशांतने नऊ वर्ष मेहनत घेऊन तासन्तास अभ्यास केला. त्यामुळे यूपीएससी सारखी कठीण परीक्षा उत्तीर्ण होऊन घवघवीत यश मिळविले. यासाठी प्रशांत यांचे आई-वडील यांनी प्रचंड मेहनत घेऊन कोणत्याही गोष्टींची कमी पडू दिली नाही. या घवघवीत यशाबद्दल प्रशांत भोजने यांचे विविध संस्था राजकीय पक्ष व आंबेडकरी जनतेकडून सत्कार करण्यात येत आहेत.

यावेळी भारतरत्न राहकारी गृहनिर्माण संस्था नागसेननगर ठाणे या संस्थेवर नवनियुक्त झालेले मुख्य प्रवर्तक राहुल भीमराव पवार, उपाध्यक्ष पदी लक्षण मोते तर सेक्रेटरी पदी मुकेश गेहलोत यांची निवड झाली असून त्यांचादेखील यथोचित सत्कार यावेळी मान्यवरांकडून करण्यात आला.

यावेळी सुरेश भोजने, सोनाली सुरेश भोजने, ॲड. श्रुतिका भोजने, दिपक पवार, राहुल भीमराव पवार, लक्ष्मण मोते, मुकेश गेहलोत, ॲड. किशोर कांबळे, पो.उपनिरीक्षक बालाजी जाधव, अभय गायकवाड, ॲड.कांबळे, सुनिल गायकवाड उत्तम देशमुख, विशाल चिले, हेमंत मुजुमदार, चिंतामण पवार, अशोक पवार, सुरेंद्र खेडेकर, सुहास कुर्ले, मोरेश्वर कांबळे गुरुजी, गणेश सागळे, ॲड. सुशील गायकवाड, नरेश गायकवाड, विवेक रोकडे, राहुल कांबळे, विश्वास वाघमारे तसेच ग्रामस्थ व महिला मंडळ उपस्थित होते.

# अपूर्णावस्थेतील रस्त्यामुळे अपघातात वाढ

। सोगाव । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील प्रमुख महामार्गापैकी एक असलेल्या कनकेश्वर फाटा ते कार्लेखिंड मार्गावर कनकेश्वर फाटा, सोगाव, मूनवली येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने रस्ता काँक्रीटीकरणचे मागील सुमारे तीन महिन्यांपासून काम सुरू आहे. या भागातील रस्ता वारंवार खराब होऊन रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडून नागरिकांसोबत वाहनचालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने रस्ता काँक्रिटीकरण कामाला काही महिन्यांपूर्वी सुरुवात करण्यात आली होती, मात्र या काही



दिवसांच्या असलेल्या रस्त्याच्या कामाला एवढे महिने होऊनही व पावसाळा तोंडावर येऊनही काम पूर्ण न झाल्याने ग्रामस्थांनी व वाहनचालकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

या मार्गाने जगातील दोन नंबरच्या असलेल्या आरसीएफ थळ कारखान्याकडे जाणाऱ्या अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते, तसेच याभागातील थळ, किहीम, आवास, सासवणे, मांडवा याठिकाणी पर्यटक मोठ्या प्रमाणात येत असतात, यासोबतच या भागात राजकीय, सामाजिक, सेलेब्रिटी, उद्योजक आदी मान्यवरांचे फार्महाऊस मोठ्या प्रमाणात आहेत. ही सर्व मंडळी याच मार्गाने प्रवास करत असतात. या भागामध्ये मोठ्या प्रमाणावर विकासाची कामे सुरू असल्याने खडी, माती, सिमेंट आदी अवजड वाहतूक करणारी वाहनेसुद्धा याच मार्गाने प्रवास करत असल्याने वारंवार अपघात होऊन वाहतूक कोंडीमुळे अडथळा निर्माण होत असल्याने सर्वसामान्य नागरिकांना, वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने लक्ष देऊन या मार्गावरील रस्त्याच्या काँक्रीटीकरणचे काम युद्धपातळीवर पूर्ण करावे, अशी मागणी याभागातील ग्रामस्थ, पर्यटक व वाहनचालकांनी केली आहे.

अलिबाग येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना सदर रस्त्याच्या झालेल्या दुर्दशेबद्दल प्रतिक्रिया घेण्यासाठी संपर्क साधला असता त्यांनी फोन उचलून प्रतिसाद दिला नाही.

## असिस्टंट नर्सिंग कोर्सचे उद्‌घाटन

। रसायनी । वार्ताहर ।

उज्वल भविष्य सामाजिक संस्था व जन शिक्षण संस्थान रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने उज्वल भविष्य नानासाहेब कुंटे तांत्रिक विद्यालय वरसोली येथे 'असिस्टंट नर्सिंग' या कोर्सचे दिमाखात उद्‌घाटन करण्यात आले. समाजातील गरीब व गरजू बेरोजगार युवक-युवतींना स्वतःच्या पायावर उभे राहून त्यांनी स्वयंरोजगार निर्माण करण्यासाठी संस्थेतर्फे पहिली बॅच मोफत शिकवण्यात येणार आहे. तसेच, विद्यार्थ्यांना कौशल भारत-कुशल भारत अंतर्गत केंद्र सरकार मान्यता प्राप्त कोर्स पूर्णत्वाचे प्रमाणपत्र दिले जाणार आहेत.

# तंबाखूविरोधी दिन साजरा

। रसायनी । वार्ताहर ।

ग्रामीण रुग्णालय चौकच्या वैद्यकीय अधिक्षक डॉ. सविता कालेल यांच्यावतीने आणि आई-बाबा फाऊंडेशनचे प्रवीण नवरे यांच्या माध्यमातून तंबाखूविरोधी दिवस, दंत चिकित्सा आणि आरोग्य तपासणी करण्यात आली.



ग्रामीण रुग्णालय चौक वैद्यकिय अधिक्षक डॉ. सविता कालेल व ग्रामीण रुग्णालय यांनी आसरे येथील आई-बाबा फाऊंडेशन येथिल २८० सुधारित रुग्णांची तपासणी केली. यावेळी येथे तंबाखू विरोधी दिवस पाळण्यात येऊन सर्व रुग्णांची दंत चिकित्सा डॉ. राजन यादव यांनी केली. डॉ. राजन यादव यांनी मुखाचा कर्करोग, घशाचा कर्करोग, गर्भाशय कर्करोग, तंबाखूचे दुष्परिणाम याबद्दल सविस्तर माहिती दिली. ६७ रुग्णांचे सिबीसी, थायरॉईड, शुगर, एड्स तपासणी, सिकलेस, एचआयव्ही तपासणी करून औषध देण्यात आली. यावेळी तंबाखू मुक्तीची शपथ देण्यात आली.



# एकनाथ घरत सेवानिवृत्त

। उरण । वार्ताहर ।

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील क्षेत्र व्यवस्थापक या पदावर कार्यरत असलेले दिघोडे येथील एकनाथ रामदास घरत विहित वयोमानानुसार त्यांच्या वयाच्या ५८ व्या वर्षी सेवा निवृत्त झाले. एकनाथ घरत यांनी महामंडळात गेली ३४ वर्षे सेवा केली. महामंडळाच्या विविध कार्यालयात त्यांनी महामंडळाचे कार्य उत्तमरित्या केले. त्यांच्या सेवा निवृत्तनिमित्त मुख्यालय मुंबई येथे यथोचित सत्कार करण्यात आला. यानंतर दिघोडे येथील निवास स्थानी सेवा निवृत्ती सोहळा पार पडला. या सोहळ्यास वैजनाथ ठाकूर, कुंदा ठाकूर, कीर्तीनिधी ठाकूर, अभिजित पाटील उपस्थित होते. एकनाथ घरत यांनी आपले मनोगत व्यक्त करताना पत्नी रजनी घरत यांच्या सहकार्याबद्दल विशेष उल्लेख केला.

## साहिलचे यश

। उरण । प्रतिनिधी ।

वीर वाजेकर महाविद्यालय फुंडे येथील बीएमएस शाखेचा विद्यार्थी साहिल सुनील ठाकूर याने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ झालेल्या पदवी परीक्षेत शेवटच्या सहामाही परीक्षेत १० ग्रेस गुणांकन मिळवून बीएमएस पदवी शाखेत महाविद्यालयात प्रथम येण्याचा मान पटकवला. त्याच्या या यशाबद्दल त्याच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. प्रचंड जिद्द व मेहनत, अभ्यासू व्यक्तिमत्त्व असलेला साहिल प्राथमिक शिक्षण घेत असल्यापासून नेहमीच चांगल्या गुणांनी पुढे जात होता. महाविद्यालयातील शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन व अविरत अभ्यास करून त्याने हे यश संपादित करून त्याने आपल्या गावाचे व घराण्याचे नाव उंचावले.

# दरडप्रणव क्षेत्रात नव्या ८ गावांचा समावेश

। रसायनी । वार्ताहर ।

खालापूर तालुक्यात गेल्या वर्षी ९ गावांचा दरडप्रणव क्षेत्रात समावेश होता. त्यात आणखी ८ गावांचा समावेश झाला असुन सुभाषनगर खोपोलीच्या अहवालानुसार वर्ग-१ मध्ये असल्याने तेथे सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांनी मान्सून पूर्व तयारीची बैठक व आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण या दोन्ही गोष्टींचा अभ्यास केला असून नैसर्गिक आपत्तीस सामोरे जाण्याची तयारी केली आहे. सुभाष नगर वर्ग १, दत्तवाडी वर्ग ३, तोंडली वर्ग ३ यांचा सर्व्हे झाला असून काजूवाडी, ताडवाडी, गारभाट धनगरवाडी, बिडखुर्द, जांबरुंग, चिंचवली गोहे यांचा सर्व्हे झालेला नाही. तर टेंबेवाडी, जंगमवाडी, चांगवाडी, हाशाची पट्टी, काटवन, ढेबेवाडी-बर्गेवाडी, मुठा (माडप ठाकूरवाडी) व वीरगाव (कुंभीवली ठाकूरवाडी) या आठ गावांचा नव्याने संभाव्य दरडप्रणव म्हणून आराखड्यात सामाविष्ट करण्यात आली आहेत. मात्र, यांचाही सर्व्हे झाला नाही. यातील सुभाष नगर यांचा प्रस्ताव शासनाला पाठविण्यात आल्याची माहिती निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी दिली.

सन २०२३ ला सुभाष नगर यांचे तात्पुरते स्थलांतर मस्को वर्कर कॉलनी खोपोली येथे करण्यात आले होते. दत्तवाडी येथिल लोकांची सोय अनुभविक प्रशिक्षण संस्था नारंगी येथे करण्यात आली होती. काजूवाडी येथिल ५ कुटुंबाचे स्थलांतर त्यांच्या नातेवाईक यांच्या घरी केले होते.

ताडवाडी येथील दरडप्रणव क्षेत्रातील लोकांचे रायगड जिल्हा परिषद शाळा आंबेवाडी, तर काहींचे चिंचमाळ येथिल साई मंदिरात सोय झाली होती.

गारभाट धनगरवाडी ही खालापूर व कर्जत तालुक्याच्या सीमेवर असून त्यांना जवळचे व सोयीचे ठिकाण माथेरान असल्याने माथेरान येथील त्यांचे नातेवाईक यांच्या घरी सोय करण्यात आली होती. बीडखुर्द व जांबरुंग येथील दरडप्रणव लोकांची सोय अष्टविनायकमधिल महड देवस्थानच्या भक्त निवासात करण्यात आली होती. टेंबेवाडी येथील लोक हनुमान मंदिर टेंबेवाडी, जंगमवाडी यांची समाज मंदिर, चांगवाडी यांची समाजमंदिर व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत, हाशाची पट्टी येथिल दोन घरांची सोय कर्जत तालुक्यातील मोहाचीवाडी नेरळ येथे करण्यात आली होती.



# समुद्र किनाऱ्याचा अभ्यासदौरा संपन्न

। उरण । प्रतिनिधी ।

अरबी समुद्राच्या खाडीचे सानिध्य लाभलेला उरण तालुक्यातील जवळपास पाच हजार लोकवस्तीचा गाव म्हणजे वशेणी गाव. अरबी समुद्राचे करंजा बंदर मार्गे पाताळगंगा नदीपर्यंत पाणी घुसते. याच पाताळगंगा खाडीत वशेणी दादर हा समुद्राचा खाडी किनारा येतो. बदलते हवामान व लोकजीवन शैलीचा या खाडी किनाऱ्यावर झालेला परिणाम अभ्यासण्यासाठी नुकताच वशेणी इतिहास संपादकीय मंडळाचा समुद्रकिनाऱ्याचा अभ्यास दौरा संपन्न झाला. या अभ्यास दौऱ्याची सुरूवात समुद्राबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी जलपूजेने करण्यात आली. या वेळेस समुद्राला श्रीफळ अर्पण करण्यात आला. यानंतर खाडी किनारा, कांदळवने, खाजनाची जागा, समुद्री जीव यांचे निरीक्षण आणि तौलनिक अभ्यास देखील करण्यात आला. या तौलनिक अभ्यासातून गेल्या २० ते २५ वर्षापूर्वीचा समुद्रकिनारा आणि आताचा समुद्रकिनारा यामध्ये खूपच बदल झालेला दिसून आला.

**निवडक**

## दुचाकीचा अपघात

**श्रीवर्धन :** कोलमांडला गावाजवळ रोडच्या बाजुला असलेल्या महावितरणच्या पोलजवळ यमाहा दुचाकीचालक रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून मोटरसायकल भरधाव वेगात चालवुन पुढे असणाऱ्या मोटरसायकला ओव्हरटेक करत असताना उजव्या बाजुने जोरात धडक देत अपघात केला. या अपघातात एकूण चारजण जखमी झाले आहेत. याबाबत श्रीवर्धन पोलीस ठाणे येथ यमाहा चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह शरद काळदाते हे करीत आहेत.

## अवैध फलकांचे पाडकाम

**पनवेल :** तालुक्यामध्ये अनेक रस्त्यांवर खासगी आणि सरकारी जमीनींवर अवैध फलक उभारले गेले आहेत. मागील अनेक वर्षे सरकारी जमीनींवर फलक उभारुन त्याचे भाडे घेणारी टोळी पनवेलमध्ये सक्रीय आहे. कोन सावळा रस्त्यालगत २० फलक काढण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी मिलिंद कदम यांनी २ क्रेन आणि १० मजूर घेऊन पाडकाम सुरू केले. घाटकोपर येथील फलकाच्या दुर्घटनेत अनेकांचा बळी गेल्यावर का होईना, सरकारी यंत्रणा पनवेलमध्ये अवैध फलकांविरोधात जोरदार मोहीम राबवित आहे.

## मोफत आरोग्य शिबीर

**पनवेल :** शनिवार ८ जून रोजी छाबा फाउंडेशन ट्रस्ट व सिमीरा डायग्नोस्टिक तर्फे पनवेल महानगरपालिकेचे मा. सभापती विकास घरत यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात मधुमेह चाचणी, रक्तदाब चाचणी, थायरॉईड चाचणी, कॉलेस्ट्रॉल चाचणी करण्यात येणार आहे. हे सकाळी ८ ते दुपारी २ वाजेपर्यंत कामोठे येथील यू अँड लाईफ सायन्स श्री कृष्ण बालाजी सोसायटी, सेक्टर ३४ येथे होणार आहे.

## पार्कींग परिसरात मृतदेह

**पनवेल :** रेल्वे स्टेशन पार्कींगच्या बाहेर मोकळ्या जागेत एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. या इसमाचे अंदाजे वय ६० वर्षे, डोक्याचे केस काळे-पांढरे, दाढी मिशी वाढलेली व पांढरी, बांधा सडपातळ, उंची अंदाजे ५ फुट असून अंगात पांढऱ्या रंगाचा फुल बाह्याचा शर्ट व लाल रंगाची चौकडीची लुंगी घातलेली आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

## ड्रग्ज विक्रेत्याचा हल्ला

**पनवेल :** अंमली पदार्थांची विक्री करत असल्याची पोलिसांना बातमी देणाऱ्या भंगार विक्रेत्यावर व त्याच्या सहकाऱ्यांवर आरोपीने धारदार शस्त्राने हल्ला केल्याची घटना कळंबोली परिसरात घडली आहे. मोहम्मद चौधरी (४८) हा अंमली पदार्थ विक्री करत असून त्याची माहिती इम्रान (३८) याने पोलिसांना दिली होती. त्यामुळे पोलिसांनी मोहम्मदवर कारवाई केली होती. याचा राग चौधरी याने मनात धरून इम्रान हा दुचाकीवरुन गंगासिंह याच्यासोबत चालला असताना त्याच्यावर चाकूने हल्ला करण्यात आला.

# माथेरानला वाहतूक कोंडीचे ग्रहण



**। माथेरान । वार्ताहर ।**

**माथेरानचा पर्यटन हंगाम सध्या बहरला आहे. परंतु, तीन दिवसाच्या मेगाब्लॉकने माथेरानचे पर्यटन कोलमडले असून सुट्टीच्या दिवशी नेरळ-माथेरान घाटामध्ये वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.**

■ पर्यटकांना फटका
■ पालिकेचे दुर्लक्ष

मध्य रेल्वेने घेतलेला तीन दिवसाचा मेगाब्लॉक हा माथेरानच्या पर्यटनासाठी फायदेशीर ठरला होता. मेगा ब्लॉकमुळे अनेकांनी सुट्टी घेतली होती. तर, अनेकांना सुट्टी दिली गेली होती. तसेच, मुंबईमध्ये उकड्याने हैराण झालेल्या नागरिकांनी येथून जवळच असलेल्या माथेरानला पसंती दिली होती. परंतु, माथेरानला येताना अनेकांनी आपली स्वतःची वाहने आणणे पसंत केले होते. यामुळे नेरळ माथेरान घाटामध्ये वाहनांच्या लांबच्या लांब रांगा लागल्या होत्या. सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सोनोने व त्यांचा पूर्ण कर्मचारी वर्ग येथील वाहतुक नियंत्रण करण्याकरता पूर्ण प्रयत्न करीत होते. तरीही स्थानिक टॅक्सी व पर्यटकांच्या गाड्यांमुळे प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडी झाल्यामुळे स्थानिक टॅक्सी संघटनेकडून काही काळ टॅक्सी बंद ठेवण्यात आल्या होत्या. त्यामुळे नेरळ स्टेशनला पर्यटकांची तोबा गर्दी झाली होती.

माथेरानमध्ये सुट्टीच्या दिवसांमध्ये नेहमीच नेरळ-माथेरान घाटात व माथेरान वाहन तळामध्ये प्रचंड गर्दी होत असल्याने पर्यटकांना तात्काळ थांबावे लागते. यावर उपाययोजना करण्यास शासन असमर्थ ठरत आहे. या वाहनतळाला लागूनच माथेरान नगरपालिकेचा भूखंड पडून आहे. जो नगरपालिकेकडे वर्ग करण्यात आलेला आहे व ज्यावर वाहनतळ व्हावे अशी मागणी गेल्या अनेक वर्षापासून येथील स्थानिक करत आहेत. परंतु, त्याकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळेच माथेरानच्या गर्दीच्या दिवशी पर्यटकांना त्याचा फटका सहन करावा लागत आहे.

# कर्मयोगी शास्त्रज्ञाचा सत्कार



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

रसायन तंत्रज्ञान संस्था (आयसीटी), मुंबई व मराठी विज्ञान परिषद यांनी संयुक्तपणे आयोजित केलेला पद्मभूषण प्रा. ज्येष्ठराज भालचंद्र उर्फ जे.बी. जोशी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त त्यांचा हृद्य सत्कार समारंभ रविवारी (दि.२) मुंबई येथे संपन्न झाला.

प्रा.एम.एम.शर्मा, डॉ. रघुनाथ माशेलकर व डॉ. अनिल काकोडकर हे तिन्ही पद्मविभूषण प्राप्त ज्येष्ठ शास्त्रज्ञ या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रा. जोशी यांच्या मसूर गावाच्या शाळेतील शिक्षक ज्ञानेश्वर भोज (९२) आणि शिक्षिका प्रतिभा ताम्हणकर (८४) या समारंभास आवर्जून उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रा.जे.बी. जोशी यांनी आपले विचार मांडत आपल्या संशोधन कार्याचा आढावा तर मांडलाच पण आगामी काळात हाती घेण्यात येणाऱ्या कार्याचे सुतोवाचही केले. अ.पां. देशपांडे यांनी आभार प्रदर्शन करताना प्रा. जोशी यांनी मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष या नात्याने गेल्या दहावार्षातील त्यांच्या योगदानाचा समर्पक आढावा घेतला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन त्यांचाच एक विद्यार्थी डॉ. हेमंत जोगळेकर यांनी केले.

# मातीचा बंधारा गाळ मुक्त कधी ?

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील गावंडवाडी येथील मातीचा बंधारा अनेक वर्षे गाळ काढण्याच्या प्रतीक्षेत आहे. मात्र, जून महिना सुरू झाला तरी गाळ काढण्याची कामे लघु पाटबंधारे विभागाने सुरू केली नाहीत. दरम्यान, हा मातीचा बंधारा दगड-माती तसेच गाळाने भरलेला असल्याने तेथील नळपाणी योजना धोक्यात आल्या आहेत.

खांडस ग्रामपंचायतमध्ये गावंड वाडी आणि मोरेवाडी या आदिवासी वाडीमध्ये गावंड वाडी मातीचा बंधारा बांधण्यात आला होता. त्या बंधाऱ्याच्या पाण्यावर स्थानिक आदिवासी लोक पिण्याच्या पाणी तसेच भाजीपाला शेतीसाठी पाण्याचा वापर करायचे. मात्र, स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेऊन त्या ठिकाणी मातीचा बंधारा बांधण्यात आला. गेली ३० वर्षे या मातीच्या बंधाऱ्यात साचलेली गाळ शासनाच्या यंत्रणेने काढला नसल्याने त्यातील नैसर्गिक झरे बंद झाले आहेत. त्याचवेळी या मातीचे बंधाऱ्यातील पाण्याचा पाझर हा गाळ, दगड येऊन भरला आहे. त्यामुळे पाण्याचा पाझर बंद झाल्याने पाण्याची भूजल क्षमता देखील कमी झाली आहे. त्यामुळे मातीचा बंधाराच्या खाली असलेल्या सर्व विहिरी आटल्या आहेत.



# माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा




**। पेझारी । वार्ताहर ।**

कोएसोच्या पोयनाड येथील ना.ना.पाटील जूनियर कॉलेजच्या १९८९ मधील बारावी बॅचच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा नुकताच श्रीगाव येथे संपन्न झाला. यावेळी उद्योजक अनिल झेमसे यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी प्रास्ताविकात शाळेतील तत्कालीन स्मृतींना उजाळा देण्यात आला. तसेच, आपल्या शिक्षकांनी आणि शाळेतील पदाधिकारी यांनी आपल्याला चांगले मार्गदर्शन केले म्हणूनच आपण आपापल्या क्षेत्रात चांगले कार्य करत आहोत म्हणत गुरुजनांबद्दल व पदाधिकाऱ्यांबद्दल ऋण व्यक्त केले.

यावेळी जे.के.एल. प्रसाद, अनिल बागुल, प्रवीण गुंजाळ, राजाराम पाटील, उल्हास पाटील, डॉ.सतीश पाटील, विजय जाधव, सायली पाटील-पिंगळे, अनुपमा पाटील-चवरकर, योगेश टेमकर, श्रीनिवास पोळ, मनोहर किसवे, परेश मोबारकर, उमेश बैकर, सुनील निकम आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेल येथे भात विक्री

**। पनवेल । वार्ताहर ।**

डॉ. बा.सा.कोकण कृषि विद्यापीठ दापोली अंतर्गत पनवेल येथे खार जमीन संशोधन केंद्र कार्यान्वीत आहे. या केंद्राद्वारे खार जमीनीसाठी उपयुक्त पनवेल १ व ट्रॉम्ये कोकण खारा या भात जातीचे बियाणे विक्री चालू आहे. दोन्ही भात वाणांचा पक्वतेचा कालावधी १२५ ते १३० दिवसांचा असून ते मध्यम क्षार सहनशील आहेत. तरी किनारपट्टी लगतच्या क्षारपड जमीनीमध्ये लागवडीकरीता शेतकऱ्यांनी ही बियाणे खरेदी करण्याचे आवाहन खार जमीन शास्त्रज्ञ खार जमीन संशोधन केंद्र पनवेल यांनी केले आहे. अधिक माहीतीसाठी जी. के.खोपकर ८२७५२७००७८ यांच्याशी संपर्क साधावा.



# क्षत्रिय मराठा समाजाचे अधिवेशन

**। तळा । वार्ताहर ।**

तळा तालुका क्षत्रिय मराठा समाजाचे वार्षिक अधिवेशन उत्साहात संपन्न झाले. मराठा सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाची सुरुवात समाजाचे अध्यक्ष सुभाष पाशीलकर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. तसेच, तीन वर्षांसाठी नविन कार्यकारी मंडळाची नियुक्ती करण्यात आली. ज्यामध्ये अध्यक्षपदी सुभाष पाशीलकर, उपाध्यक्षपदी चंद्रकांत शिंदे, सचिव दीपक भोसले, सहसचिव नरेश सुर्वे, खजिनदार शरद चव्हाण व सहखजिनदारपदी मदन कदम यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. याप्रसंगी तालुक्यातील मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उद्योजक-प्राध्यापक चर्चासत्र

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाद्वारे उद्योजक - प्राध्यापक चर्चासत्राचे आयोजन दि.३ जून रोजी सकाळी ११.३० ते दुपारी २.०० या वेळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ येथे करण्यात आले होते. उद्योजक व शैक्षणिक संकुल एकत्रित येऊन विद्यार्थ्यांना करियरच्या विविध संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने तसेच उद्योग घटकांना गुणवत्तापूर्ण मनुष्यबळ निर्मिती करण्याच्या दृष्टीने उद्योजक-प्राध्यापक चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या चर्चासत्रात विद्यापीठाचे विभाग प्रमुख, महाड मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन व टाटा पावरच्या एकूण ४० पेक्षा अधिक प्रतिनिधींनी सहभाग दर्शविला. या चर्चासत्रात महाड मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशनचे अध्यक्ष संभाजी पठारे यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. तर, कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. कारभारी काळे यांनी भूषविले. या चर्चासत्रासाठी डॉ. संजय नलबलवार, डॉ. नीरज अग्रवाल, डॉ. एस.एम. पोरे आणि पदविका विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरेचे प्राचार्य डॉ. मधुकर दाभाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.



# अरुण पौडवाल कृतज्ञता गौरव पुरस्कार

**। मुंबई । सांस्कृतिक प्रतिनिधी ।**

गेली २७ वर्षे सुप्रसिद्ध अकॉर्डियन वादक, कुशल संगीत संयोजक आणि प्रतिभाशाली संगीतकार अरुण पौडवाल यांच्या स्मृती जपणारा त्यांच्या स्मृति प्रित्यर्थ 'कृतज्ञता गौरव पुरस्कार' देण्यात येतो. कुठलाही बडेजावपणा न आणता अत्यंत साधेपणाने घरगुती मंगलमय वातावरणात हा पुरस्कार प्रसिद्ध गायक संगीतकार त्यागराज खाडिलकर यांना सुप्रसिद्ध पार्श्वगायिका पद्मश्री अनुराधाजी पौडवाल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरूप ५१ हजार रोख रुपये आणि सन्मानचिन्ह असे आहे.

या गौरव सन्मानाची संकल्पना विशद करताना सुप्रसिद्ध पार्श्वगायिका पद्मश्री अनुराधा पौडवाल म्हणाल्या, अरुणजी हे स्वतः एक अतिशय उच्चकोटीचे संगीतकार होते. त्यामुळे कलाकारांचा योग्य तो सन्मान व्हायला पाहिजे. बहुतेकवेळा त्यांचे चाहते काही सत्कार सोहळे करीत असतात. पण कलाकाराने एका कलाकाराचा सन्मान करणे याला जास्त महत्व आहे. आजचा हा २७ वा सोहळा आहे. याच्या आधी ज्या-ज्या कलाकारांनी अरुणजींसोबत काम केले आहे, ज्यांना त्यांच्या कामाची पद्धत, त्यांचा स्वभाव माहित आहे, अश्या कलावंतांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. यावेळी त्यागराज यांची निवड करण्यामागे विशेष कारण आहे. काही महिन्यापूर्वी त्यांच्या एका कार्यक्रमासाठी विशेष प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी दिव्यांग मुलांना घेऊन एक अल्बम केला होता. अश्या मुलांसोबत केलेला हा जगातील एकमेव असा सुंदर अल्बम आहे, असे मला वाटतेय.त्यांच्यातील ही गोष्ट मनाला भिडली आणि म्हणूनच त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली.



**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- बोअरवेल-विहिरीसाठी मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन-९२२६७६६१२९
- सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय २५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६
- Autocad draftsman required in architectural firm. Location :Alibag Comtact no:9970391697
- अलिबाग शहरात मध्यवर्ती ठिकाणी ३५० स्क्वे.फूट. गाळा भाड्याने देणे आहे. (बीच रोड, जुना नगरपालिकेजवळ, संपर्क - ९४२११६३१२४
- घरकाम व मुलांना सांभाळणे साठी बाई हवी पंतनगर अलिबाग येथे. पूर्णवेळ राहणारी किंवा सकाळी ८.००ते ६ संपर्क-९८६७२१५४९५/८०९७२०५९३९
- अलिबाग शहराच्या जवळ N.A.Plot आहेत. भातशेती वरकस जमिन अलिबाग रोहा रोड वर उपलब्ध. सनस्टोन रॉयल इस्टेट अलिबाग-बायपास रोड. ८६६९००६९०२/९२७०८८८८०३
- ५०००० रूपये किमतीचा CNC मशीन ऑपरेटिंगचा कोर्स मोफत, मोफत, मोफत. पात्रता : १२ वी किंवा १५ वी पास, वयोमर्यादा- ३० वर्षेपर्यंत. पगार- १०००० रूपये, ८ तास ड्युटी, संपर्क : ९०४९६५५५२३
- टायपिंग आणि झेरॉक्सकरीता मुले मुली पाहिजेत. संपर्क : ९२७१५९४४२०
- N.A . प्लॉट पाहिजे: ४ ते ५ गुंठे, अलिबाग-पोयनाड रस्त्यावर चेंढरे मारूती मंदिरापासून वेश्वीच्या RCF कॉलनीच्या पुढे अर्धा किलोमीटर पर्यंत. मुख्य रस्त्यापासून प्लॉटपर्यंत १२मीटरचा पक्का रस्ता असणे आवश्यक. जमिनीचा उतारा व नकाशा पाठविणे ही पूर्वअट आहे. टायटल क्लियर असल्यास, जागा व किंमत पसंत पडल्यास त्वरित व्यवहार पूर्ण करण्याची हमी एजंट क्षमस्व, संपर्क : ९००४०३१६९५.

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

# प्रशासकीय भवनात तहसील कार्यालय सुरू

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नवीन प्रशासकीय कार्यालयाचे उद्घाटन थाटामाटात करण्यात आले होते. मात्र, अनेक महिन्यांपासून नवीन प्रशासकीय भवनात कामकाज सुरू झाले नसल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली होती. परंतु, लोकसभा निवडणुकीचे कामकाज याच प्रशासकीय भवनामधून झाले होते आणि त्यामुळे कार्यालय या ठिकाणीच सुरू करावे, अशी मागणी वाढली होती. अखेर या कार्यालयात तहसील कार्यालय आणि उपविभागीय कार्यालय सुरू करण्यात आले आहे.**




*टेकडीवर तहसील कार्यालय असल्याने शहराप्रमाणे ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात विविध कामांसाठी नागरिक येत असतात. टेकडीवर कार्यालय असल्याने गोरगरिबांना रिक्षाने जावे लागत होते. एका कामासाठी तासंतास फुकट जात असल्याने काम होईपर्यंत उपाशीपोटी थांबावे लागत होते.*

*तसेच, तहसील कार्यालयात सर्वच स्तरातील नागरिक येत असतात. उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, शबरी योजना, निराधार योजना, राजीव गांधी योजना, फ्लॅट, जमीन जागेचे रजिस्ट्रेशन करण्यासाठी, स्टॅम्प भरण्यासाठी तर काही तक्रार देण्यासाठी असे विविध कामांसाठी वयस्कर, विद्यार्थी, महिला वर्ग येत असतात. तर, उपविभागीय कार्यालय श्रीराम पुलापलीकडे असल्याने नागरिकांना उलटा फेरफटका मारावे लागत असल्याने पैसा आणि वेळ जात आहे.*

*लोकसभा निवडणुकी दरम्यान तहसील कार्यालय, उपविभागीय कार्यालय, पाटबंधारे विभागाचे अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंचायत समिती, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी असे सर्व प्रशासकीय कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांचे कामकाज नवीन प्रशासकीय इमारतीत निवडणुकीचे काम सुरू होते. मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यावर तहसील कार्यालय आणि उपविभागातील सर्व फाईल, सामान हलविण्याचे काम सुरू केले आणि यापुढे प्रशासकीय कार्यालयात सारा कारभार होणार आहे. प्रथम उपविभागीय अधिकारी यांनी आपले कार्यालय या ठिकाणी सुरू केले असून तेथे सर्व दैनंदिन कामे सुरू आहेत. उपविभागीय कार्यालय हे प्रशासकीय भवनामध्ये दुसऱ्या मजल्यावर आहे.*

## टेकडी चढण्याचे कष्ट थांबले

**एकाच ठिकाणी कार्यालय येणार असल्याने सरकारी कामानिमित्त येणाऱ्यांची दमछाक होणार नाही. छोटी मोठी सर्व कामे लवकर होतील. याठिकाणी प्रशस्त पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच, हे कार्यालय शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने त्यांचा फायदा तालुक्यातील सर्व जनतेला होऊ शकतो.**

**-अजित नैराळे उप विभागीय अधिकारी**

# अहिल्यादेवी होळकरांचा आदर्श तरुणांनी घ्यावा : काकडे

। रसायनी । वार्ताहर ।

राजामाता अहिल्यादेवी होळकर यांचा आदर्श तरुण पिढीने घेऊन कारभार करावा, असे आवाहन ऑल इंडिया धनगर समाज महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण काकडे यांनी केले आहे, ते शेलू येथील आयोजित अहिल्यादेवी होळकर जयंती कार्यक्रमात बोलत होते. यावेळी समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामागिरी करणाऱ्या मान्यवरांचा समाजभूषण अहिल्यारत्न, पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शिवसृष्टी पार्क शेलू, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर उत्सव जयंती समिती शेलू, क्षत्रिय धनगर समाज कर्जत यांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची २९९ वी जयंती शेलू येथे पार पडली. यावेळी समाज बांधवाच्या वतीने ढोल ताशांच्या गजरात अहिल्यादेवीच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. तर छत्रपती शिवाजी महाराज आणि राजामाता अहिल्यादेवी होळकर यांची वेशभूषा सकारलेल्या व्यक्तींची घोड्यावरून मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी ऑल इंडिया धनगर समाज महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण काकडे, माजी सरपंच तथा समाजसेवक गुरुनाथ शेठ मसणे ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष संतोष ठाकूर, हर हर चांगभले धनगर समाज संस्थेचे रायगड जिल्हाध्यक्ष ॲड संतोष आखाडे, समाजसेवक परमानंद नाचण, ज्योतिलिंग सामाजिक बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र पुकळे, वैभव यादव बाळासाहेब गुटुगडे, आदींसह अनेक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

\- मुख्य संपादक


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. रघुनाथ शनिवार पाटील, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे .

**मिळकतीचे वर्णन : मौजे बार्डी, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ८/१ | १.०८.५० <br> पो.ख. ०.१३.७० | ४.०६ | श्री. दशरथ काशिनाथ कांबरी, वगैरे एकूण |
| | एकुण १.२२.२० | | |

यापैकी खरेदी क्षेत्र ०.२०.०० हे.आर.पॉ.

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- ०५/०६/२०२४

सही/-
**ॲड. उषा जे. कांबळे**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तरनगर, मुद्रे
मो. नं. ७३८५००४८०६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिथे मालक यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिथे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

मौजे - सापेले तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

| जमिन मालक | सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मदन कृष्णा कामत | ७/१० | ०-१६-०० | ०-०९ |
| मदन कृष्णा कामत व अंजली मदन कामत | ७/१४ | ०-८६-०० | ०-३६ |
| मदन कृष्णा कामत व अंजली मदन कामत | ७/१५ | ०-५३-०० | ०-१७ |
| मदन कृष्णा कामत व अंजली मदन कामत | ७/१७ | ०-४२-०० | ०-३४ |
| मदन कृष्णा कामत व अंजली मदन कामत | ७/२० | ०-७५-०० | ०-६४ |
| मदन कृष्णा कामत व अंजली मदन कामत | ७/२१ | ०-४१-०० | ०-३४ |
| मदन कृष्णा कामत व अंजली मदन कामत | ७/२२ | ०-१८-०० | ०-१९ |
| मदन कृष्णा कामत व अंजली मदन कामत | ७/२३ | १-४०-०० | ०-८८ |
| मदन कृष्णा कामत व अंजली मदन कामत | ७/२५ | ०-८५-०० | ०-४१ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार. गहाण. दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०५/०६/२०२४

**ॲड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर. अमराई रोड,
कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

आमचे अशिल श्री. चंद्रकांत गजानन नाईक व श्रीम. गीतांजली मनोज म्हात्रे यांच्यातर्फे तमाम जनतेस याद्वारे असे सुचित करण्यात येते की,

मौजे म्हात्रोळी, ता.अलिबाग येथील खालील वर्णनाच्या मिळकती या जाहीर नोटीसीचा विषय आहेत :-

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| म्हात्रोळी | २२७ | ०-५२-७० | १०-०६ |
| म्हात्रोळी | २२८ | ०-४१-२० | ०५-९६ |

मौजे म्हात्रोळी, ता.अलिबाग येथील गट नं. २२७ ही मिळकत आमचे अशिल, श्री. चंद्रकांत गजानन नाईक, श्रीम. गीतांजली मनोज म्हात्रे व त्याची मुले तसेच श्री. मकरंद अनंत म्हात्रे, श्रीम. प्रतिभा प्रमोद कवळे व श्रीम. प्रतिभा प्रल्हाद पाटील यांचे सामाईक मालकीची असून सदरची संपूर्ण मिळकत ही श्री. चंद्रकांत गजानन नाईक यांच्या एकट्याच्या ताबेकब्जावहीवाटीत असून गेली अनेक वर्षे तेच सदर मिळकत कशीत असून तिचा शेतसारा देखील तेच भरत आहे.

तसेच मौजे म्हात्रोळी, ता.अलिबाग येथील गट नं. २२८ ही मिळकत आमचे अशिलांपैकी श्रीम.गीतांजली मनोज म्हात्रे व त्याची मुले तसेच श्री. मकरंद अनंत म्हात्रे, श्रीम. प्रतिभा प्रमोद कवळे व श्रीम. प्रतिभा प्रल्हाद पाटील यांचे सामाईक मालकीची आहे.

वर नमुद दोन्ही मिळकती या वर नमुद इसमांच्या सामाईक मालकीच्या मिळकती असून त्या मिळकतींचे अद्याप वाटप झालेले नाही. असे असताना श्री. मकरंद अनंत म्हात्रे, श्रीम. प्रतिभा प्रमोद कवळे व श्रीम. प्रतिभा प्रल्हाद पाटील यांनी सदर मिळकतींचा व्यवहार त्रयस्त इसमाबरोबर ठरविला असून त्याबाबत खरेदीदारांनी ता.२५/०५/२०२४ रोजीच्या 'दैनिक कृषीवल' या वृत्तपत्रात हरकती मागविणारी जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे. त्यास आमचे अशिलांनी हरकत घेतली आहे. परंतु सदर नोटीसीमध्ये खरेदीदारांचे नाव नमुद नाही.

तरी, वर नमुद मौजे म्हात्रोळी गट नं. २२७ व २२८ या मिळकतीसंदर्भात कुणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये, तसा व्यवहार कुणीही केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही व आमचे अशिल सदर व्यवहाराबाबत योग्य ती दिवाणी कारवाई करतील, हे सर्वांना कळावे.

अलिबाग
तारीख : ०४/०६/ २०२४

**ॲड. विधान अरविंद पाटील**
'वत्सला' टिळक रोड, स्टेट बँकेसमोर
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

## जाहीर नोटीस

दि. ०५/०६/२०२४

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे हेदीवली, ता. कर्जत जि. रायगड येथील

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| ९२ | ९ | ०-३५-० पैकी ०-१८-० | ०-३१ |

ची शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचेकडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविले आहे. तसा उभयतांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबध नाही. व असल्यास ते जाणीवपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडुन दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करून आमचे अशिल उपरोक्त शेतजमीन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहीर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा. ''मातोश्री'' निवास आवळस,
ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशील श्री. यतेन्द्र सिंह यादव, यांनी जमीन मालक श्री. सुरेश पांडुरंग माळी, यांचेकडून त्यांचे, भोगवटासदरी नावे असलेल्या, ताबेकब्जा, वहिवाटीच्या, खालील वर्णनाच्या जमीन मिळकती, कायमच्या विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतींचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**-: मिळकतींचे वर्णन :-**

**मौजे - पिंगळस, ता.कर्जत, जि. रायगड, येथील मिळकती**

| अ.न | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १ | १४/४ | ०.१३.०० | ०.०९ |
| २ | १५/३/अ | ०.६५.०० | ०.३२ |
| ३ | १५/३/ब | ०.४६.०० | ०.३१ |
| ४ | १५/३/क | ०.४५.०० | ०.३१ |

वर वर्णन केलेल्या मिळकतींबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही, व कसल्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, १४ (चौदा) दिवसांचे आत, खालील सही करणार ॲडव्होकेट, यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकती विकत घेण्याचा व्यवहार, खरेदीखत करुन पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत दि. ०५/०६/२०२४

कळावे
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री.साई सावली, सो.लि., रूम नं. १०, दुसरा माळा
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत, जि. रायगड, पिन - ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

जावक क्रमांक/ निधी नोंदणी १३०३/२०२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, रायगड
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय, रायगड विभाग, कल्पतरू
इमारत, मुख्य पोस्ट ऑफीस जवळ,
अलिबाग, रायगड, रायगड, रायगड, रायगड
दि.४/०५/२०२४

## चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन.क्रमांक : RGD/12017/18/24
फेफार अहवाल/अर्ज क्रमांक : २०७/२०२४
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक तेजस्विनी सामाजिक व सांस्कृतिक फाउंडेशन अलिबाग तालुका अलिबाग बाबत।
न्यासाचा पत्ता :- कुसुंबळे अलिबाग, अलिबाग, अलिबाग, रायगड, अलिबाग कुसुम्बले
अर्जदार : जीविता सूरज पाटील,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| | 1CASH | 2000.00 |

(अ) जंगम मिळकत : रोख रू.२०००/- मात्र (अक्षरी रूपये दोन हजार मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|

(ब) स्थावर मिळकत : रोख रू. /- मात्र (अक्षरी रूपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक ०४-०६-२०२४ रोजी दिली.

सही/-
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**रायगड**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे लाखोले, ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक निर्मला दशरथ म्हात्रे व कृष्णीबाई पृथ्वीराज पाटील यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हेनं./गट नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| लाखोले | २२/ब | ०.३६.३० <br> पो.ख. ०.०१.०० <br> एकूण क्षेत्र ०.३७.३० | ५.३० |

वरील संपूर्ण क्षेत्र हे आमचे अशिल नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी. वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिप : सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण : पेण
दि.०५/०६/२०२४

सही
**ॲड हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
साई श्रध्दा सबुरी बिल्डिंग बी-विंग,
ब्लॉक नं. ००२, प्रभु आळी, पेण

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की, खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत ही या खाली दिलेल्या जमिन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नांवे असून त्या त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मौजे कोरखंडा, ता. तळा जि. रायगड येथील मिळकत...**

| मालकाचं नांव | गट नं. | एकुण क्षेत्र हे. आर | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| खालिद-मल्लीक | ७६/अ | ०-८०-०० | ०.२६ |
| | ७७ | ३-३७-०० | १.३६ |
| | ७८ | ३-८२-० | १.५६ |
| | ७९ | १-७६-०० | ०.५४ |
| | ८० | १-५२-०० | ०.४६ |
| | ८१ | ३-८३-०० | १.५ |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमिन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिन चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालू असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दि.०५/०६/२०२४

सही/-
**ॲड. पी. जी. दाभाडे**
रा. फ्लॅट नं. ४०२, बी. वींग, चौथा मजला,
साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर,
डॉ. वागळे हॉस्पिटल जवळ, ता. रोहा, जि. रायगड
पिन नं.४०२१०९ मोबा नं.९२७२७१३९५६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे- मांडला, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) शरद पांडुरंग गोंधळी यांचे कडून कायम मालकी हक्क विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| मांडला, ता. मुरुड | ६० | ०५.५०.२० <br> पो.ख. ००.७३.८० <br> एकूण ०६-२४-०० | १४.९९ |

वरील जमिन मिळकत पैकी शरद पांडुरंग गोंधळी यांचे नावे असणारे प्लॅंट क्र. ०४ क्षेत्र ०१.३७. ५५. हे आर. पो. ख. ००.१८.४५ हे.आर.पैकी ००.२१.४ हे. आर. क्षेत्र या नोटीसीचा विषय आहे.

वर वर्णन केल्याप्रमाणे क्षेत्राची जमिन मिळकती ह्या त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्या बाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावार कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरीहक्क या व अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत आल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखीस्वरूपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचा ही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ४/०६/२०२४

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. नागांव, ता. अलिबाग
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे खारकोलेटी, ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक विनोद विजय धामणे व वैभव विजय धामणे यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हेनं./गट नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| खारकोलेटी | ७०/१/१ | ०.३५.०० <br> पो.ख. ०.०१.१० <br> एकूण क्षेत्र ०.३६.१० | ४.६८ |

वरील संपुर्ण क्षेत्रापैकी ०.२०.०० हे.आर इतके क्षेत्र हे आमचे अशिल नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी. वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण : पेण
दि.०५/०६/२०२४

सही
**ॲड. हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
साई श्रध्दा सबुरी बिल्डिंग बी-विंग,
ब्लॉक नं. ००२, प्रभु आळी, पेण

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांच्या सुचनेवरून आम्ही १) श्री.विश्वास विश्वनाथ थळे, २) श्रीमती. अनिता अरूण भगत, ३) सौ. रेश्मी राजेंद्र पाटील, ४) सौ. वृषाली चंद्रशेखर घरत, ५) सौ. विनंती विशाल म्हात्रे (पुर्वाश्रमीची विनंती विश्वनाथ थळे) (यापुढे संयुक्तपणे मालक म्हणून संबोधित केलेले) ज्यांनी असे निवेदीत केले आहे की, खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेल्या व यापुढे 'सदर मिळकत'असे संबोधण्यात आलेल्या मिळकतीमध्ये त्यांस पूर्णपणे व निर्वेध मालकी हक्क आहेत व त्या मिळकतीमधून कुणाचाही कोणत्याही प्रकारचा जाण्या-येण्याचा पुर्वापार वहिवाटीचा अथवा अन्य कोणत्याही प्रकारच्या वहिवाटीच्या रस्त्याचा हक्क नाही, अथवा ती मिळकत त्यांनी कुणासही विकणेचा अथवा अन्य प्रकारे तबदिल करण्याचा करार-मदार कुणाबरोबरही केलेला नाही, त्या मिळकतीचे मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

तरी ज्या इसमांचा त्यामिळकतीमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, कुळवहिवाट, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणूक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकुमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असेल, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट अे.डी. द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतीमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहित संबंध नाही अथवा असल्यास तो कायमस्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व मिळकतीचे मालकी हक्क निर्वेध आहेत असे मानून आमचे अशिल खरेदी व्यवहारपूर्ण करतील. नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन**

तुकडी व जिल्हा रायगड पोटतुकडी व तालुका अलिबाग जिल्हा निबंधक रायगड दुय्यम निबंधक अलिबाग यांचे अधिकार क्षेत्रातील जिल्हा परिषद रायगड पंचायत समिती अलिबाग स्थानिक ग्रुप ग्रामपंचायत परहूरचे हद्दीतील मौजे पालांबे येथील खालील वर्णनाची मिळकत.

स. नं. ३/२, क्षेत्र ० हे. ७९.४० आर, आकार २१ रूपये ०६ पैसे या मिळकती पैकी खालील प्रमाणे चतु:सिमांकीत दक्षिणेकडील ० हे. ४० आर एवढी मिळकत, ज्यासी चतु:सिमा:

पुर्वेस : मौजे पालांबे स. नं. ३/३ या मिळकतीची हद्द.
पश्चिमेस : गाव रस्ता व मौजे पालांबे स. नं. २/१ या मिळकतीची हद्द.
दक्षिणेस : मौजे पालांबे स. नं. १ व स. नं. १०/३ या मिळकतींच्या हद्दी.
उत्तरेस : मौजे पालांबे स. नं. ३/२ या मिळकतीपैकी उर्वरित मिळकत.

अलिबाग
तारीख : ५/६/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मण आळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वरसोली, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालक राम फतुमल कोटवानी, प्रदिप राम कोटवानी, प्रविण तुकाराम घरत, मिलींद गजानन चव्हाण, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| वरसोली ता. अलिबाग, | १३९/२/ब | जिरायत ०-११-८० | ४.९७ |

वर वर्णन जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त , साठेकरार, मृत्युपत्र, अन्नबस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, बारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, ताबेकब्जा वहिवाट, रस्ता वहिवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह मखाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तकार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजून, गुहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ०४/०६/२०२४
मोबा. ९८२२०१७१६१

**ॲड. प्रशांत रामचंद्र म्हात्रे**
मु. भुते, पो. थळ
ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे खार दुतर्फा बोर्ली, ता. पेण, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालक गोरखनाथ कायारी पाटील, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| खारदुतर्फा बोर्ली ता. पेण, | १७२/५ | जिरायत ०-१४-४० <br> पो.ख. ०-०१-०० <br> एकुण ०-१५-४० | २.१२ |

वर वर्णन जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध, बोजा रहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, बारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, ताबेकब्जा वहिवाट, रस्ता वहिवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडून दिला आहे असे समजून, गृहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ०४/०६/२०२४
मोबा. ९८२२०१७१६१

**ॲड. प्रशांत रामचंद्र म्हात्रे**
मु. भुते, पो. थळ
ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे खारसापोली, ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक अंकुश जनार्दन पाटील यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./गट नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| खारसापोली | ९५/६ | ०.०६.६० <br> पो.ख. ०.००.२० <br> एकूण क्षेत्र ०.०६.८० | १.५६ |

वरील संपूर्ण क्षेत्र हे आमचे अशिल नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी. वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिप : सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण : पेण
दि.०५/०६/२०२४

सही/-
**ॲड हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
साई श्रध्दा सबुरी बिल्डिंग बी-विंग,
ब्लॉक नं. ००२ प्रभु आळी, पेण

# डॅनिल मेदवेदेवला पराभवाचा धक्का

**। पॅरिस । वृत्तयंस्था ।**

**फ्रेंच ओपन टेनिस ग्रँडस्लॅममध्ये सोमवारी पुरुष एकेरीतील पाचवा मानांकित डॅनिल मेदवेदेव याला पराभवाचा धक्का बसला. ॲलेक्स दी मिनॉर याने त्याच्यावर चार सेटमध्ये विजय मिळवला. महिला एकेरी विभागात अरीना सबलेंका, एलीना रायबकीना यांनी प्रतिस्पर्ध्यांवर मात करीत आगेकूच केली. सबलेंका हिने इम्मा नवारो हिला, तर रायबकीना हिने एलिना स्वितोलिना हिला पराभूत केले.**

## सबलेंका, रायबकीनाची आगेकूच

डॅनिल मेदवेदेव याने पहिला सेट ६-४ असा आपल्या नावावर केला. मात्र, ॲलेक्स दी मिनॉर याने पुढील तीनही सेटमध्ये मेदवेदेव याच्यावर वर्चस्व गाजवले. त्याने या तीन सेटमध्ये ६-२, ६-१, ६-३ अशी बाजी मारली व मेदवेदेवचा खेळ खल्लास केला. दुसरी मानांकित अरीना सबलेंका हिने २२वी मानांकित इम्मा नवारो हिला ६-२, ६-३ असे सहज नमवले. सबलेंका हिने एक तास व नऊ मिनिटांत प्रतिस्पर्धीचे आव्हान संपुष्टात आणले. चौथी मानांकित एलीना रायबकीना हिने १५वी मानांकित एलीना स्वितोलिना हिच्यावर ६-४, ६-३ अशी सरळ दोन सेटमध्ये मात केली. तिनेही एक तास व नऊ मिनिटांत विजय साकारला.

स्विअतेक, गॉफची घोडदौडमहिला एकेरीत रविवारी मध्यरात्री इगा स्विअतेक व कोको गॉफ या दोन मानांकित खेळाडूंनी पुढे पाऊल टाकले. प्रथम मानांकित स्विअतेक हिने ॲनास्तासिया पोतापोवा हिचा ६-०, ६-० असा धुव्वा उडवला. स्विअतेक ही अवघ्या ४० मिनिटांमध्ये विजयी झाली. तिसरी मानांकित गॉफ हिनेही शानदार



विजयाला गवसणी घातली. तिने एलिसाबेता कोशिअरेटो हिचे आव्हान ६-१, ६-२ असे संपुष्टात आणले. यानिक सिनरची यशस्वी झुंजपुरुष विभागातील एकेरीच्या लढतीत दुसरा मानांकित यानिक सिनर याने संघर्षपूर्ण विजय साकारला.

सिनर याने कोरेंटीन मॉटेट याच्यावर चार सेटमध्ये मात केली. सिनर याने पहिला सेट २-६ असा गमावला. त्यानंतर मात्र त्याने झोकात पुनरागमन केले. सिनर याने पुढील तीन सेट ६-३, ६-२, ६-१ असे जिंकत सामना जिंकला आणि पुढे वाटचाल केली. सिनरसह पुरुषांच्या एकेरीत कार्लोस अल्काराझ, ग्रिगोर दिमित्रोव, स्टेफानोस सितसिपास यांनीही घोडदौड केली.

# श्रीलंकेचा लाजीरवाणा पराभव

**। न्यूयॉर्क । वार्ताहर ।**

आयपीएलमध्ये सुमार गोलंदाजी करीत असलेल्या ॲनरिक नॉर्खिया याने दक्षिण आफ्रिकेला टी-२० विश्वकरंडकातील सलामीचा सामना एकहाती जिंकून दिला. त्याने सात धावांमध्ये चार फलंदाजांना पॅव्हेलियनमध्ये पाठवल्यामुळे दक्षिण आफ्रिकेला श्रीलंकेचा डाव ७७ धावांमध्ये गुंडाळता आला. माफक धावांच्या आव्हानाचा पाठलाग करणाऱ्या दक्षिण आफ्रिकेने चार फलंदाज गमावत विजयी लक्ष्य ओलांडले. दक्षिण आफ्रिकेने ड गटात विजयी सलामी देत दोन गुण कमवले.

श्रीलंकन संघ ७७ धावांवर गारद झाल्यामुळे दक्षिण आफ्रिकन संघासमोर मोठे आव्हान नव्हते; पण गोलंदाजांना साथ देत असलेल्या खेळपट्टीवर दक्षिण आफ्रिकन



फलंदाजांचीही तारांबळ उडाली. नुवान तुषाराने रिझा हेंड्रीक्सला चार धावांवर बाद केले. दासुन शनाकाने फॉर्ममध्ये नसलेल्या एडन मार्करमला तंबूत पाठवले. त्यानंतर कर्णधार वनिंदू हसरंगा याने क्विंटॉन डी कॉक (२० ) व ट्रिस्टन स्टब्स (१३) यांना बाद केले; पण हेनरिक क्लासेन (नाबाद १९) व डेव्हिड मिलर (नाबाद ६) यांनी कोणतीही जोखीम न पत्करता दक्षिण आफ्रिकेच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

# सात्विक-चिरागचे सर्वस्व पणाला

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

सात्विक साईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी या भारतीय पुरुष दुहेरीतील जोडीवर सुरू होत असलेल्या इंडोनेशिया ओपन सुपर सीरिजमध्ये भारताची मदार असणार आहे. सात्विक-चिराग जोडीला जेतेपद राखण्यासाठी सर्वस्व पणाला लावावे लागणार आहे. पॅरिस ऑलिंपिकदृष्टीने ही स्पर्धा सात्विक-चिराग जोडीसाठी अत्यंत महत्त्वाची असणार आहे.

सात्विक साईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी या जोडीने यंदाच्या मोसमात चार स्पर्धांच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. यापैकी दोन स्पर्धा जिंकण्यात या जोडीला यश लाभले आहे. त्यामुळे पॅरिस ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक पटकावण्यासाठी हीच जोडी प्रबळ दावेदार समजली



जात आहे. त्याआधी इंडोनेशिया स्पर्धेत दमदार कामगिरी करीत या जोडीला आत्मविश्वास कमवावा लागणार आहे.

महिला एकेरीत पी. व्ही. सिंधूचा कस लागणार आहे. तसेच, पुरुषांच्या एकेरीत एच. एस. प्रणोय, लक्ष्य सेन, किदांबी श्रीकांत, किरण जॉर्ज, प्रियांशू राजावत या खेळाडूंकडे ऑलिंपिकची तयारी करण्याची संधी मिळणार आहे. तसेच तनीषा क्रॅस्टो-अशविनी पोन्नाप्पा, ट्रीसा जॉली-गायत्री गोपीचंद या जोड्यांवर महिला दुहेरीची मदार अवलंबून असणार आहे.

# अफगाणिस्तानचा सर्वात मोठा विजय

**। न्युयॉर्क । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषक स्पर्धेतील पाचवा सामना अफगाणिस्तान विरुद्ध युगांडा संघात पार पडला. गयानाला झालेल्या या सामन्यात अफगाणिस्तानने तब्बल १२५ धावांनी विजय मिळवला. यासह या स्पर्धेतील आपल्या मोहिमेची विजयाने सुरुवात केली आहे. दरम्यान, अफगाणिस्तानचा हा आंतरराष्ट्रीय टी-२० मधील धावांच्या तुलनेतील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा विजय आहे. तसेच, टी-२० वर्ल्ड कपमधील हा एकूण चौथ्या क्रमांकाचा सर्वात मोठा विजय आहे.

या सामन्यात अफगाणिस्तानने युगांडासमोर १८४ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना युगांडा संघ १६ षटकातच अवघ्या ५८ धावांवर सर्वबाद झाले. त्यांनी फक्त १८ धावांतच ५ विकेट्स गमावल्या होत्या. युगांडाकडून फक्त रियाझत अली शाह आणि रॉबिन्सन ओबुया यांनाच दोन आकडी धावसंख्या पार करता आली. रियाझतने ११ धावा केल्या, तर रॉबिन्सनने १४ धावा केल्या. तसेच चार खेळाडू शुन्यावरच बाद झाले. अफगाणिस्तानकडून गोलंदाजीत फझलहक फारुकीने सर्वाधिक ५ विकेट्स घेतल्या. त्याने ४ षटकात केवळ ९ धावा देत या ५ विकेट्स घेतल्या. तसेच नवीन-उल-हक आणि कर्णधार राशिद खान यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या.



### टी-२० विश्वचषकातील मोठे विजय

१७२ धावा- श्रीलंका विरुद्ध केनिया, २००७
१३० धावा- अफगाणिस्तान विरुद्ध स्कॉटलंड, २०२१
१३० धावा- दक्षिण आफ्रिका विरुद्ध स्कॉटलड, २००९
१२५ धावा- अफगाणिस्तान विरुद्ध युगांडा, २०२४
११६ धावा- इंग्लंड विरुद्ध अफगाणिस्तान, २०१२

# भारतीय संघाचा जोरदार सराव

**। न्युयॉर्क । वृत्तसंस्था ।**

वेस्ट इंडिज आणि अमेरिका येथे यंदा टी-२० विश्वचषकाचे नववे पर्व खेळवले जात आहे. या स्पर्धेत भारतीय संघ आपल्या मोहिमेची सुरुवात आयर्लंडविरुद्धच्या सामन्याने करणार आहे. भारत आणि आयर्लंड संघात बुधवारी (दि.५) हा सामना होणार आहे. भारत आणि आयर्लंड संघ न्युयॉर्कमधील नव्याने बांधण्यात आलेल्या नसाऊ काउंटी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. हा सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री ८ वाजता सुरू होईल. या सामन्यापूर्वी भारतीय संघ जोरदार सराव करताना दिसला आहे. बीसीसीआयने भारतीय संघाच्या सरावाचा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये भारतीय संघातील सर्व खेळाडू मैदानात घाम गाळताना दिसत आहेत. यामध्ये दिसते की मुख्य संघातील १५ खेळाडूच नाही, तर राखीव खेळाडूंमध्ये असलेले शुभमन गिल, रिंकू सिंग, खलील अहमद आणि आवेश खान या खेळाडूंनीही मेहनत घेतल्याचे दिसले आहे.










कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)